Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीके से
अंग्रेजी बोलना
सिखाने के लिये ही
हम जाने जाते है।
9028851719

RNI NO. MAHMAR/2020/84035
BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ
मंगळवार २ सप्टेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : १६५ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday 2 September 2025 | Year : 5 | Issue : 165 | Daily | Rate: Rs. 5/-

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



# 145 कोटींची लोकसंख्या मोजण्यासाठी 14,618.95 कोटी

**नवी दिल्ली :** बऱ्याच काळानंतर देशाची अधिकृत लोकसंख्या किती हे मोजले जाणार आहे. ही जनगणना 2027 मध्ये केली जाणार असून यासाठी भारताच्या रजिस्ट्रार जनरल (RGI) यांनी केंद्र सरकारकडे भरमसाठ निधीचा मागणी केली आहे. 2027 च्या जनगणनेसाठी 14,618.95 कोटी रुपयांच्या बजेटची मागणी करण्यात आली आहे. ही जनगणना देशातील पहिली डिजिटल जनगणना असणार आहे. यात जातीविषयी देखील माहिती असेल. खर्च वित्त समिती (ईएफसी) ही अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी एक केंद्रीय संस्था आहे. ही संस्था सरकारी योजना आणि प्रकल्पांचे मुल्यांकन करते आणि तो परवडणारा आहे की नाही यावर मंजुरी देते. या ईएफसीकडे जनगणना करणाऱ्या आरजीआयने मंजुरीसाठी एकूण खर्च कळविला आहे. ईएफसीकडून मंजुरी मिळाल्यानंतर आरजीआय गृह मंत्रालय आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करेल. यासर्वांची मंजुरी मिळाल्यानंतरच जनगणनेला वेग येणार आहे. एप्रिल ते सप्टेंबर 2026 या कालावधीत घरांची यादी करण्याचे काम आणि फेब्रुवारी 2027 मध्ये लडाख, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड वगळता देशभरात सुरू होणारी लोकसंख्या गणना अशा दोन टप्प्यांत ही जनगणना केली जाणार आहे. घरांची यादी करताना कुटुंबांच्या घरांची परिस्थिती, घरगुती सुविधा आणि मालमत्तेची माहिती गोळा केली जाणार आहे. मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे हा डेटा गोळा केला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे देशाचे नागरिक त्यांची माहिती स्वतः अपलोड करू शकणार आहेत. यासाठी काही अटी, नियम असणार आहेत. यासाठी जनगणना देखरेख आणि देखरेख प्रणाली (CMMS) ही वेबसाइट देखील विकसित केली जात आहे.






## तृणमूलच्या निषेधाविरुद्ध लष्करी कारवाई अनैतिक व अलोकतांत्रिक : ममता बॅनर्जी

### लष्कराला तटस्थ राहण्याचे आवाहन, मुख्यमंत्री ममता यांनी भाजपवर टीका केली.



**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्ष - तृणमूल काँग्रेस (टीएमसी) राज्यातील स्थलांतरितांच्या 'छळ' विरोधात आवाज उठवत आहे. कोलकातामध्ये तृणमूल काँग्रेस निदर्शनासाठी एक व्यासपीठ तयार करत होती, जे लष्कराने पाडल्याचा आरोप आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लष्कराच्या या कृतीला अनैतिक आणि अलोकतांत्रिक म्हटले आहे. सैन्याने बंगालमधील स्थलांतरितांच्या 'छळ' विरोधात निषेध करण्यासाठी बांधलेले तृणमूल काँग्रेसचे व्यासपीठ पाडण्यामागे भाजपचा हात असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. विरोधी पक्ष सूडाचे राजकारण करत आहे. मुख्यमंत्री म्हणाले, कोलकातामधील टीएमसीचा मंच हटवण्यापूर्वी लष्कराने कोलकाता पोलिसांशी सल्लामसलत करायला हवी होती. त्या इशारादायक स्वरात म्हणाल्या, मी सैन्याला दोष देत नाही, मी त्यांना फक्त तटस्थ राहण्याचे आणि भाजपच्या हातातील बाहुली बनण्याचे टाळण्याचे आवाहन करते.

## महत्त्वाच्या बातम्या

### मोदी-पुतिन भेट SCO शिखर परिषदेत

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी चीनमधील शिखर परिषदेत भेट घेतली. या भेटीत त्यांनी भारत आणि रशिया दरम्यान उर्जाक्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर भर दिला. मोदी यांनी रशियन कच्च्या तेलावर अवलंबून असल्याचे पुन्हा अधोरेखित केले; रशिया भारतासाठी समुद्री मार्गावरील कच्च्या तेलाचा सर्वात मोठा पुरवठादार बनला आहे. यावेळी, त्यांनी अमेरिकेच्या नवीन दुप्पट झालेल्या करप्रणालीवरील टीकाही नमूद केली आणि अमेरिकेच्या कृतींना 'अन्यायकारक' म्हणून संबोधले .

### नीतिगत फेरबदल युनायटेड किंगडममध्ये

ब्रिटनचे लेबर पक्षाचे नेते कीर स्टार्मर यांनी Downing Street (ब्रिटनचे प्रधानमंत्री कार्यालय) मधील वरिष्ठ सल्लागारांसाठी फेरबदल केले आहेत. डॅरेन जोन्स यांना आता दिवसभरातील कामकाजाचे मुख्य प्रभारी बनवण्यात आले आहे .

### ग्लोबल सप्लाय चेनमध्ये AI तंत्रज्ञानाची भूमिका

TradeInt नावाच्या कंपनीने AI-आधारित उपाय सादर केले आहेत, जे जागतिक व्यापारातील पुरवठा साखळीतील व्यत्ययांना सामोरे जाण्यास सक्षम होतील. यामुळे व्यापार व प्रवाह अधिक प्रभावी व सुव्यवस्थित होण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अफगाणिस्तानातील भूकंपात 800 लोकांचा मृत्य...




**नवी दिल्ली :** पुन्हा एकदा अफगाणिस्तानात एका शक्तिशाली भूकंपाने शेकडो लोकांचा बळी घेतला आहे. रविवारी रात्री उशिरा पूर्व अफगाणिस्तानात झालेल्या या भूकंपात आतापर्यंत 800 लोकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे, तर 2500 हून अधिक लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे. अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, रात्री 11:47 वाजता झालेल्या 6.0 तीव्रतेच्या भूकंपाचे केंद्र नांगरहार प्रांतातील जलालाबाद शहराच्या पूर्व-ईशान्येस 27 किलोमीटर अंतरावर होते. त्याची खोली फक्त 8 किलोमीटर होती, ज्यामुळे हा भूकंप अत्यंत धोकादायक बनला. अफगाणिस्तानमध्ये झालेल्या या भूकंपामुळे झालेल्या प्रचंड विध्वंसानंतर, शेजारच्या देशाची भौगोलिक परिस्थिती समजून घेणे महत्त्वाचे आहे. या देशाला सतत भूकंप का येतात? हिमालयीन प्रदेशाशी याचा काय संबंध आहे? अफगाणिस्तानमध्ये धोकादायक भूकंपांचा रविवारी रात्री उशिरा अफगाणिस्तानला भूकंपाचा जोरदार धक्का बसला.

## मतचोरीचा अणुबॉम्ब टाकला, आता हायड्रोजन बॉम्ब येणार : राहुल गांधी



**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या 'मतदार हक्क' यात्रेच्या समारोपाच्या रॅलीतून भाजपवर पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, 'जेव्हा आम्ही महादेवपुरा येथे मत चोरीचे सत्य उघड केले, तेव्हा आम्ही अणुबॉम्ब टाकला. पण, आता हायड्रोजन बॉम्ब येणार आहे. हायड्रोजन बॉम्बनंतर नरेंद्र मोदी या देशाला आपला चेहरा दाखवू शकणार नाहीत.' राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांच्या मतदार हक्क यात्रेचा आज शेवटचा दिवस आहे. राहुल गांधी यांनी समारोपाच्या रॅलीतून पुन्हा एकदा भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. राहुल म्हणाले की, 'ही यात्रा बिहारमध्ये सुरू झाली, आम्ही त्याला मतदार हक्क यात्रा असे नाव दिले. तिकडे महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेनेकडून निवडणुका चोरीला गेल्या. लोकसभा निवडणुकीनंतर मतदार यादीत सुमारे 1 कोटी नवीन मतदार जोडले गेले. आमच्या आघाडीला लोकसभेत जे काही मते मिळाली, तीच मते आम्हाला विधानसभेत मिळाली. मात्र, सर्व नवीन मते भाजपच्या खात्यात गेली. आम्ही लोकसभा जिंकलो पण विधानसभेत आमचे तिन्ही बलाढ्य पक्ष संपले. राहुल पुढे म्हणाले, 'निवडणूक आयोग आणि भाजपने मिळून मते चोरली. कर्नाटकातील महादेवपुरातील एका भागात 1 लाखाहून अधिक बनावट मतदार असल्याचे आम्ही उघड केले. मात्र, निवडणूक आयोग आम्हाला मतदार यादी, व्हिडिओग्राफी देत नाही. ही मत चोरी म्हणजे अधिकारांची चोरी, मत चोरी म्हणजे आरक्षणाची चोरी, मत चोरी म्हणजे रोजगाराची चोरी, मत चोरी म्हणजे शिक्षणाची चोरी, मत चोरी म्हणजे लोकशाहीची चोरी, मत चोरी म्हणजे तरुणांच्या भविष्याची चोरी. ते फक्त मते घेत नाहीत, तर ते तुमची जमीन, तुमचे रेशन कार्ड, सर्व काही हिसकावून घेतील आणि अदानी-अंबानींना देतील.

## मंत्री छगन भुजबळ जरांगेंवर संतापले



**मुंबई :** आपल्या देशात संविधान आणि कायदा आहे. कायद्याप्रमाणेच आरक्षण मिळते. शेतकरी असले म्हणजे सगळेच कुणबी होत नाहीत. मराठा समाज मागास नाहीत हे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. अधिवेशनात एकमुखी ठराव केला तरीही ओबीसीतून आरक्षण देता येत नाही. कायद्यात ते टिकणार नाही. आमच्यावर अन्याय झाला तर आम्हीही लाखोंच्या संख्येने मुंबईत येऊ अशी घोषणा मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणावरून आणखी वाद चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ओबीसी समाजातील प्रमुख नेत्यांच्या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, ओबीसीतून आरक्षण देणे कुठल्याही मुख्यमंत्र्यांच्या हातात नाही. ब्राह्मण समाजही शेती करतो, मग तेदेखील कुणबी होतील का?, आर्थिक मागास असलेल्यांना EWS आरक्षण दिले आहे. कुठल्या जातीला ओबीसीत समाविष्ट करता येत नाही. हा अधिकार कुणालाही नाही. ओबीसी प्रवर्गात सध्या 374 जाती आहेत. EWS शिवाय मराठा समाजाला आणखी 10 टक्के आरक्षण दिले आहे. पवार असो वा फडणवीस कुणीही ओबीसीत जाती समाविष्ट करू शकत नाही. ज्या पोटजाती होत्या, त्या ओबीसीत आल्या. ओबीसींच्या वाट्यात दुसरा वाटेकरी नको असे त्यांनी सांगितले.
तसेच ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. आतापर्यंत मराठा आरक्षणासाठी शिंदे समितीने काम केले. आम्ही जिल्ह्यात, तालुक्यात आंदोलन सुरू केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले जाणार आहे. आमच्या विरोधात जाणुनबुजून काही गोष्टी केल्या जात असतील तर आम्हीही गणपती झाल्यानंतर आम्हीही मुंबईत येऊ असा इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी दिला.
दरम्यान, भटक्या विमुक्त ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. आम्ही कुणावर हल्ले करत नाही, पण आमच्यावर हल्ले कशासाठी करता? जर हल्ले होत असतील तर पोलिसांनी ताबडतोब पाऊले उचलायला हवीत. मी ओबीसींचा नेता म्हणून इथे बसलोय, मंत्रिमंडळातही ओबीसीचा नेता म्हणून बसलोय. फक्त आज नाही तर 35 वर्ष बसलोय. जर मराठा म्हणून मंत्री तिथे जात असतील तर मीदेखील गोरगरिब ओबीसींसाठी लढू शकतो. ज्या लोकांनी खोटी प्रमाणपत्रे घेतली त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली.

## 'रिपब्लिकन' ही आमची ओळख ! रणजित मेश्राम




**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनाच्या अंतिम टप्प्यावर आम्हाला जगण्याच्या दोन ओळख (Identity) दिल्या. एक बौध्द व दूसरे रिपब्लिकन. एक वैयक्तिक व दूसरे सार्वजनिक. दोन्हींचे आपल्या जीवनात तितकेच महत्त्व असल्याचे मत प्रसिद्ध पत्रकार प्रा रणजित मेश्राम यांनी इथे व्यक्त केले. ते रिपब्लिकन विचार परिषदेच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. ही परिषद 'द रिपब्लिकन'ने स्थानिक कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित केली होती. आयोजनप्रमुख हर्षवर्धन ढोके हे होते. मंचावर डॉ. एन.व्ही. ढोके, सनदी अधिकारी किशोर गजभिये, डॉ. निशा शेंडे , वंदना जीवणे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व संचलन ज्योती खोब्रागडे व नवीन इंदुरकर यांनी केले. शेड्युल्ड कॉस्ट फेडरेशन गुंडाळून रिपब्लिकन पक्षाची निर्मिती झाली होती. त्यामुळे जातीचे प्रतिनिधित्व हा मुद्दाच नव्हता असे सांगून रणजित मेश्राम पूढे म्हणाले, व्यवस्थेने दुःखी कष्टी असलेल्या संधीविहिन समाजघटकाला सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य मिळवून देणे रिपब्लिकन पक्षाची निर्मिती होती. भारतीय लोक हे नागरिक आणि मतदार असे परावर्तीत झाले. ती माणसे व मने संविधानपूरक घडविणारी रिपब्लिकन पक्ष ही प्रक्रिया आहे. परिषदेत आंबेडकरी विचारवंत डॉ. एन.व्ही. ढोके तडाखेबंद बोलले. रिपब्लिकन विरोधकांचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. 'मी रिपब्लिकन' हेच माझे जगणे असल्याचे ठणकावून म्हणाले. सनदी अधिकारी किशोर गजभिये यांनी रिपब्लिकन संकल्पनेचा इतिहास पट मांडला. प्रा. निशा शेंडे यांनी सुंदर असे राजकीय विश्लेषण केले. नाट्य कलावंत वंदना जीवणे यांनी रिपब्लिकन पक्षाची गरज सांगितली. हर्षवर्धन ढोके यांचे छोटेखानी भाषण झाले. त्यांनी रिपब्लिकनची तळमळ व्यक्त केली.
विचार परिषदेला मोठी उपस्थिती होती. सभागृह भरुन होते. रिपब्लिकन टीमने परिषदेची शिस्त सांभाळली. आभार प्रदर्शन राजेश हाडके यांनी केले व परिषदेची सांगता झाली.

## अल्पसंख्याक शाळांना आरटीईमधून सूट देण्याच्या निर्णयावर न्यायालयाचा संशय

**नवी दिल्ली :** प्रमती एज्युकेशनल अँड कल्चरल ट्रस्ट प्रकरणात 2014 च्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी गंभीर प्रश्न उपस्थित केले, ज्यामध्ये असे म्हटले होते की अल्पसंख्याक शाळांना मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणाऱ्या कायद्यातून (आरटीई कायदा, 2009) सूट देण्यात आली आहे. न्या. दीपंकर दत्ता आणि ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने सांगितले की त्यांना या निर्णयाच्या अचूकतेबद्दल शंका आहे आणि त्यांनी हा मुद्दा मुख्य न्यायाधीश बीआर गवई यांच्याकडे पाठवला आहे. आरटीई कायद्याअंतर्गत, सहा ते 14 वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कायद्यात अशी तरतूद आहे की खाजगी शाळांनी दुर्बल घटकातील आणि वंचित घटकातील मुलांसाठी 25 टक्के जागा राखीव ठेवाव्यात. परंतु 2014 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रमती प्रकरणात म्हटले होते की अल्पसंख्याक शाळांना या तरतुदीतून सूट देण्यात येईल. ही सूट योग्य आहे का आणि त्यावर पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. खंडपीठाने म्हटले आहे की जर आरटीई कायदा अल्पसंख्याकांच्या हक्कांचे उल्लंघन करत असेल (कलम 30), तर प्रमती निर्णयात कलम 12 (अ) (क) त्या समुदायातील दुर्बल घटकातील मुलांसाठी मर्यादित करून वाचता येईल असा विचार करायला हवा होता. न्यायालयाने म्हटले आहे की संपूर्ण सूट देणे योग्य नाही. त्यामुळे जुन्या निर्णयाचा आढावा घ्यावा की नाही हे ठरवण्याची गरज आहे. खंडपीठाने चार महत्त्वाच्या मुद्द्यांवरचा निर्णय सरन्यायाधीशांकडे पाठवला आहे.

## दक्षिण नागपूर - सावित्रीबाई फुले नगरवासीयांचा 2 सप्टेंबरला मुख्यमंत्री सचिवालयावर धडक मोर्चा

**नागपूर :** दक्षिण नागपूरातील सर्वात मोठ्या नोटीफाईड स्लम सावित्रीबाई फुले नगर येथील रहिवाशांना मालकी हक्काचे पट्टे मिळावेत, या मागणीसाठी 2 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री सचिवालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. सन 2019 पासून शासन-प्रशासनाला शेकडो निवेदने देऊनही कारवाई न झाल्याने संतप्त झालेल्या वसाहतीतील नागरिकांनी हा मोर्चा आयोजित केला आहे. गृहनिर्माण धोरण 2025 नुसार खाजगी जमिनीवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी रहिवाशांची संमती आवश्यक नसल्याने नागरिकांच्या स्थलांतराचा धोका निर्माण झाला आहे.14-15 एकर क्षेत्रात वसलेली ही वसाहत बाहेर हाकलली जाण्याची भीती व्यक्त करत आहे.

75 वाढदिवस...



तुला जाऊन बारा वर्षे झालीत. याची आठवण अखेरच्या श्वासापर्यंत राहील.
मनोरमा घाटे
माजी कामगार कल्याण उपायुक्त महाराष्ट्र
जन्म 2/ 9/ 1950 मृत्यू 2/ 3/ 2013
वंदन
पॅंथर अॅड. सुरेशचंद्र घाटे,
लॉंग मार्च नेता व राष्ट्रीय अध्यक्ष रिपब्लिकन जनमोर्चा,
74 यशवंत स्टेडियम,
धंतोली, नागपूर.
मानसी सुरेशचंद्र घाटे (मुलगी पुणे)
रत्नमाला बदलवार (केअर टेकर)
राजेश पाटील उर्फ राजा (रिक्षा चालक)
मो. 9049 67 040427

## मराठा आरक्षण आंदोलनावर उच्च न्यायालयाची कडक भूमिका




**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने मराठा आरक्षण आंदोलनावर कडक टिप्पणी केली आहे. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन शांततेत नाही आणि त्यात सर्व अटींचे उल्लंघन करण्यात आले आहे, असे न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईत सुरू असलेल्या आंदोलनावर तातडीची सुनावणी देताना म्हटले आहे की, आम्ही काही अटींसह आंदोलनाला परवानगी दिली होती, ज्याचे आंदोलकांनी उल्लंघन केले आहे. आंदोलकांनी शहर ठप्प केले आहे आणि त्यांनी न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्राचे पालन केलेले नाही. मराठा आरक्षण आंदोलनामुळे संपूर्ण मुंबई ठप्प झाली आहे, असे मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले. यासोबतच, आंदोलन शांततेत नव्हते आणि निदर्शकांनी सर्व अटींचे उल्लंघन केले, हे न्यायालयाने मान्य केले. मंगळवारी दुपारपर्यंत शहरातील सर्व रस्ते मोकळे करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि गौतम बुद्ध यांच्या खंडपीठाने सांगितले की, निदर्शकांना फक्त आझाद मैदानावर बसण्याची परवानगी होती, परंतु ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, चर्चगेट स्टेशन, मरीन ड्राइव्ह आणि अगदी उच्च न्यायालयाबाहेरही जमले.

**न्यायालयाच्या प्रश्नावर सरकारचे उत्तर, उद्या पुन्हा सुनावणी**

न्यायालयाने सरकारला विचारले की जर लाखो लोक मुंबईत आले तर तुम्ही काय कराल? सरकारने न्यायालयाला सांगितले की गणेशोत्सवामुळे परिस्थिती हाताळणे कठीण आहे. पोलिस बळाचा कडक वापर करणे सोपे आहे परंतु त्याचे परिणाम गंभीर असतील, म्हणून संतुलन राखणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की प्रत्येक नागरिकाला निषेध करण्याचा अधिकार आहे, परंतु ते शांततेत आणि निश्चित नियमांनुसार असले पाहिजे. न्यायालय मंगळवारी या प्रकरणाची पुन्हा सुनावणी करेल. जरांगे यांचे आश्वासन केवळ औपचारिकता ठरले न्यायालयाने म्हटले आहे की, मुंबई शहर ठप्प झाले आहे. न्यायाधीश आणि वकिलांची वाहने रोखण्यात आली, दरवाजे अडवले गेले. लोक रस्त्यावर आंघोळ करत आहेत, अन्न शिजवत आहेत आणि घाण पसरवत आहेत. न्यायालयाने इशारा दिला की जरांगे आणि समर्थकांनी प्रत्येक अटी मोडल्या आहेत, आता सरकारने कायद्यानुसार कारवाई करावी आणि नवीन निदर्शकांना शहरात येण्यापासून रोखावे.

**आंदोलकांना आणि सरकारला न्यायालयाचे निर्देश**

मुंबई उच्च न्यायालयाने मराठा आंदोलनावर कडक टिप्पणी केली आहे. उच्च न्यायालयाने मनोज जरांगे यांच्या समर्थकांना परिस्थिती सुधारण्यास आणि रस्ता मोकळा करण्यास सांगितले. आंदोलनामुळे झालेल्या वाहतूक कोंडीवर उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, मुंबईतील सर्व रस्ते उद्यापर्यंत रिकामे करावेत. यासोबतच, रस्ते रिकामे असल्याची खात्री करण्याचे निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. त्याच वेळी, न्यायालयाने आंदोलकांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, फक्त पाच हजार आंदोलक मैदानात असावेत आणि उर्वरित सर्वांनी दुपारी 12 वाजेपर्यंत निघून जावे.

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांचे उपोषण चौथ्या दिवशीही सुरू आहे. आता त्यांनी आजपासून पाणी पिणे बंद करण्याची घोषणा केली आहे. राज्यातील जेजे रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने आझाद मैदानात पोहोचून जरांगे यांचे रक्तदाब आणि साखरेची पातळी तपासली.**

“ अपेक्षांचे गाठोडे बाजूला ठेवले की, जगणे अजून सोपे होते... ”



बहुजन सौरभ **संपादकीय**

# निवृत्तीच्या चर्चेतून एथेनॉलच्या राजकारणापर्यंत नवी गुंतागुंत

देशाच्या राजकीय पटावर आज अभूतपूर्व उलथापालथ सुरू आहे. एका बाजूला संघप्रमुख मोहन भागवत यांच्या 75 वर्षांनंतरच्या निवृत्तीवरून निर्माण झालेली चर्चा, तर दुसऱ्या बाजूला केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या एथेनॉल प्रकल्पावर सर्वोच्च न्यायालयात सुरू झालेली सुनावणी - हे दोन मुद्दे सध्या केवळ स्वतंत्र घटनाच नसून भारतीय राजकारणाच्या आतल्या थरांना हलवून टाकणारे ठरत आहेत. संघाच्या परंपरेनुसार 75 वर्षांनंतर सरसंघचालकांनी पदत्याग करणे अपेक्षित आहे. परंतु आजवर कधीही या वयमर्यादेवर इतकी सार्वजनिक चर्चा झालेली नव्हती. कारण यातून पुढे येणारा संदेश हा केवळ संघाच्या आतल्या नेतृत्व बदलाचा नसून प्रधानमंत्री मोदींच्या भवितव्याशी थेट निगडित आहे. मोहन भागवत यांच्या 75 वर्षांनंतरच्या निवृत्तीची चर्चा ही फक्त संघाची अंतर्गत बाब म्हणून मांडली जात आहे. पण हा ‘संघाचा शिस्तबद्ध नियम’ म्हणावा की मोदी युगाला मर्यादा आणण्यासाठीचा सिग्नल, हा खरा प्रश्न आहे. संघ कधीच थेट भिडत नाही; पण सूचक इशारे देतो. आजचा इशारा स्पष्ट आहे - ‘मोदी हे संघापेक्षा मोठे नाहीत.’ भागवत यांच्या जाण्याने मोदींना मुक्त पथ मिळणार का? की संघातर्फे मोदींवर अंकुश ठेवण्यासाठी नवीन समीकरण रचले जात आहे? या चर्चांमुळे भाजपच्या संघटनात गुप्त अस्वस्थता पसरलेली दिसते. नितीन गडकरी यांनी पुढे आणलेला एथेनॉल प्रकल्प हरितऊर्जा व पर्यावरणपूरक इंधन म्हणून सरकारने मोठ्या धडाक्यात राबवला. फायदेही मांडले गेले - हरितगृह वायू उत्सर्जनात घट, शेतकऱ्यांना ऊस-मका याचा फायदा, परकीय चलनाची बचत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने आता गंभीर प्रश्न विचारले - एथेनॉलमुळे वाहनांचे मायलेज खरेच घटते का? गाड्यांचे इंजिन आयुष्य कमी होते का? पेट्रोलपेक्षा महाग असताना एथेनॉलचा जबरदस्ती वापर का? याहून महत्त्वाचे म्हणजे, गडकरी यांच्या कुटुंबाशी संबंधित कंपनीच्या शेअर्सना प्रचंड आर्थिक लाभ झाला, हे उघडकीस आले. म्हणजेच पर्यावरणपूरक धोरणाच्या आड कॉर्पोरेट स्वार्थाचा डाव असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे. निवृत्तीच्या चर्चेपासून, एथेनॉलच्या संशयास्पद गणितांपर्यंत आणि कॉर्पोरेट घराण्यांच्या वर्चस्वापर्यंत - भारतीय राजकारण आज सत्तेच्या, पैशाच्या आणि विचारसरणीच्या संगमात अडकलेले दिसते. येत्या काही आठवड्यांत येणारे निकाल - मग ते उपराष्ट्रपती निवडणुकीचे असोत, न्यायालयीन सुनावण्या असोत किंवा संघातील नेतृत्व बदल - हे ठरवतील की भारताचे राजकीय भविष्य स्थैर्याच्या दिशेने जाते की अस्थैर्याच्या खाईकडे. निवृत्तीपासून एथेनॉलपर्यंत - सत्तेचा खोटा आव आणणारे आहे. भारतीय राजकारणात आज जी चित्रे दिसत आहेत, ती लोकशाहीच्या आरशाला फट पडल्यासारखी आहेत. संघ, भाजपा, कॉर्पोरेट घराणी आणि सरकार यांच्यातील खेळ इतका गुंतागुंतीचा झालाय की साधा शेतकरी, सामान्य नागरिक आणि मध्यमवर्ग कुठेतरी फसवला जातोय. नितीन गडकरी आणि एथेनॉल - मागचे षडयंत्र स्पष्ट होते. नितीन गडकरींचे नाव आजवर ‘विकासपुरुष’ म्हणून घेतले जाते. रस्ते, पायाभूत सुविधा, आणि एथेनॉलसारख्या ऊर्जाविषयक प्रकल्पांमुळे त्यांची दूरदृष्टी म्हणून स्तुती केली गेली. पण सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर उघडकीस आलेल्या गोष्टींनी या ‘दूरदृष्टी’ मागे भले मोठे राजकीय-आर्थिक षडयंत्र असल्याचा आरोप बळकट केला आहे. संघप्रमुख मोहन भागवत यांच्या 75 वर्षांनंतरच्या निवृत्तीची चर्चा ही केवळ परंपरा म्हणून रंगवली जाते. पण वस्तुस्थिती अशी की, हा संघाचा मोदींना इशारा आहे. मोदी स्वतःला संघापेक्षा वरचे समजतात, हे संघाला अस्वस्थ करते. म्हणजेच ही लढाई देशासाठी नाही, तर मोदी विरुद्ध संघ - कोण मोठा? या अहंकारासाठी आहे. मोदींनंतर भारताला संघाची कठोर पकड मिळणार का? की कॉर्पोरेट घराण्यांचे पूर्ण वर्चस्व होणार? किंवा मोदी स्वतः ‘कॉर्पोरेट-समर्थ हुकूमशहा’ म्हणून पुढचे दशक रंगवणार? हा प्रश्न केवळ राजकीय नाही; तो देशाच्या अर्थकारण, पर्यावरण आणि लोकशाहीच्या भविष्याशी जोडलेला आहे. लोकशाहीचे आवरण, हुकूमशाहीचे अंतरंग आज निवृत्ती, एथेनॉल, अदानी-अंबानी यांचा गाजावाजा होत आहे. पण जनता विसरत आहे की - शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पोकळ आहे, तरुणांच्या रोजगाराचे भविष्य अंधारात आहे, पर्यावरणाच्या नावाखाली पैसा ओढला जातोय, आणि लोकशाहीचे मुखवटे घालून कॉर्पोरेटशाहीचे साम्राज्य उभे राहाते. मोदीपश्चात भारत हा लोकशाहीचा नवा अध्याय असेल का, की कॉर्पोरेटशाहीच्या गुलामीचे उघड साम्राज्य? हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली. ■ ■

# मराठा आरक्षण आंदोलन मागणीचे भवितव्य




मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. यापूर्वीही राज्यात शांततेत आणि लोकशाही मार्गाने अनेकदा त्यांनी आणि एक मराठा लाख मराठ्यांनी आंदोलने केली आहेत. तसेच अनेकदा बोलके मोर्चे, मूक मोर्चेही निघाले. ‘एक मराठा लाख मराठा’ ही घोषणाही त्यातूनच जन्माला आली. त्या वेळेलाही राज्य सरकारकडून नवनव्या आयोगांची आणि समित्यांची स्थापना करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र विधानसभेत जी.आर. काढण्यात आले आणि काही कायदेही करण्यात आले. परंतू हे जी. आर. आणि कायदे पुढे मा. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात टिकू शकले नाहीत. म्हणून राज्यातील मराठा बांधव त्यांच्या आरक्षणाच्या आधिकारापासून वंचित राहीले ही खदखद आंदोलनकर्त्यात आहे. आताही मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाने जोर धरला आहे. संपूर्ण मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्या, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, सरसकट आरक्षण द्या, इतर समाजाला जसे विना अटी शर्ती आरक्षण देता, मग मराठ्यांनाच अटी शर्ती का? ई. मागण्या या आंदोलनकर्त्यांकडून होताना दिसत आहेत. या निमित्ताने मला असे वाटते की, राज्य आणि केंद्र सरकार, विविध राजकीय पक्षांचे नेते, समित्या, आयोग आणि त्यांचे अहवाल, मा. उच्च आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे त्यातील बारकावे, सत्य, वास्तव, तर्क, भ्रामकता आणि संविधानिकता हे सगळे कांगोरे मनोज जरांगे यांच्यासह सर्वच मराठा आंदोलनकर्त्या भावांनी आणि बहिणींनी नीटपणे तपासून, आभ्यासून आणि समजून घेणे गरजेचे बनले आहे, असे मला वाटते. कारण आरक्षण हा विषय आंदोलनकर्त्यांनी नीटपणे समजून घेतला पाहीजे आणि तो पुढे लढला पाहीजे तरच या आंदोलनाला काही भवितव्य आहे असे मला वाटतेय. म्हणून आंदोलनाचा एक समर्थक या नात्याने मी या लेखात काही महत्त्वपूर्ण मुद्यांचा परामर्श घेतलेला आहे. आरक्षणाच्या या आंदोलनाला बळकटी प्राप्त करून देण्याच्या उद्देशानेच हे मुद्दे मी या लेखात उपस्थित केले आहेत, जे निश्चितच या आंदोलनाला यशाकडे घेऊन जाण्यास सहाय्यक ठरतील, असे मला वाटते.

**1) टिकणारे आरक्षण कोण देणार? :-** मुळातच आरक्षण हा विषय एकट्या राज्य सरकारच्या आखत्यारीतला नाही. तर तो विविध राज्य समित्या, आयोग, केंद्रीय आयोग आणि त्यांचे अहवाल, केंद्र सरकारची ईच्छाशक्ती, संसद, मा. उच्च आणि मा. सर्वोच्च न्यायालय, मा. राष्ट्रपती आणि संविधान कायदा असा मार्गक्रमण करीत जाणारा हा विषय प्रवास आहे. म्हणून ‘आरक्षण देण्यास राज्य सरकार कटिबद्ध आहे.’ हे वाक्य मला भ्रामक वाटते. सरकारचे असे वक्तव्य म्हणजे आंदोलनाची धार बोथट करण्यासाठी तात्पुरती वापरलेली युक्ती आहे. वरवरची मलमपट्टी एवढ्यापुरतीच ती मर्यादित आहे. पण सत्य हे आहे की, 1) मराठ्यांना जर ओबीसी कोट्यातून आरक्षण पाहीजे तर मग केंद्र सरकारला घटनादुरुस्ती करावी लागेल. तशी केंद्र सरकारची इच्छा आहे काय? 2) आधी मराठ्यांचा मागास प्रवर्ग निर्माण करावा लागेल. 3) आरक्षण द्यायचे तर आयोगाकडून मागासलेपण सिद्ध करणारा डेटा उपलब्ध करावा लागणार आहे. 4) त्या आधारे कायदा बनवून तो विधीमंडळात मंजूर करून घ्यावा लागणार आहे. 5) मग पुढे तो मा. उच्च आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या कसोटीवर टिकतो की नाही? यावर अवलंबून राहील.

**ट्रिपल टेस्ट म्हणजे काय? :-** 1) ही टेस्ट ओबीसींसाठी आहे. 2) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निवाड्यात या ट्रिपल टेस्टची संकल्पना अधोरेखित केली आहे. ती अशी की 3) ओबीसी आरक्षणासाठी स्वतंत्र समर्पित आयोगाची स्थापना करणे. 4) या वर्गाची त्याच्या मागासलेपणाची वास्तविक नेमकी आणि तपशीलवार माहीती गोळा करणे. 5) प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसींचे प्रमाण किती आहे? याची नेमकी माहीती घेणे. 6) यावरून तत्कालीन महाराष्ट्र सरकारने आयोग नेमला. या आयोगाचा अहवाल मा. सर्वोच्च न्यायालयात सादरही केला. त्यात राज्यात 38टक्के ओबीसी लोकसंख्या आहे, म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेत 27टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी केली. परंतू याच अहवालात ‘आम्हाला परिपूर्ण डेटा उपलब्ध झाला नाही’, असे एक वाक्य घालून तमाम ओबीसींसोबत दगाफटका पण केला. म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने हा अहवाल फेटाळून लावला.

**क्यूरेटिव्ह पिटीशन म्हणजे काय?**

दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने अधिघोषीत केलेला कोणताही न्यायनिर्णय किंवा केलेला आदेश यांचे पुनर्विलोकन करण्याची शक्ती संविधानाच्या कलम 137 नुसार प्रदान करण्यात आलेली आहे. 1) आधी दिलेल्या निकालातून आणि त्यानंतरच्या पुनर्विचार निकालातूनही जर न्याय मिळाला नाही, तर क्यूरेटिव्ह पिटीशन दाखल करता येते. राज्य सरकारने क्यूरेटिव्ह पिटीशन दाखल केलेले आहे. परंतु ते मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

**102 वी घटनादुरुस्ती काय आहे?**

दि. 11 ऑगस्ट 2018 रोजी केंद्रीय भारत (मोदी) सरकारने संविधानातील कलम 338 ख - मागासवर्गीयांकरीता राष्ट्रीय आयोग (1) मधे असे संशोधन केले आहे की, ‘सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाकरीता राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, म्हणून ओळखला जाणारा एक आयोग असेल’. या संशोधनानुसार मराठा समाजास आरक्षण देण्याचे राज्य सरकारचे आधिकार संपुष्टात आले आहेत. हे माहित असूनही, तेव्हाचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी घाईघाईने केवळ मराठ्यांच्या मतांवर डोळा ठेवून आरक्षणाचा कायदा केला, जो पुढे मा. सर्वोच्च न्यायालयात रद्दबातल झाला. या निवाड्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी अशी की, 1) मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घोषित करता येऊ शकणार नाही. 2) मराठा समाजाला आरक्षणाची गरज नाही. 3) मराठा समाजाला आरक्षण देताना 50टक्केची मर्यादा भंग करण्याचा कोणताही आधार राज्य सरकार दाखल करू शकले नाही. याबाबींची पूर्तता करण्यासाठी येथून पुढे राज्यसरकार आणि केंद्र सरकार कोणते प्रयत्न करणार आहेत? केंद्रीय भारत (मोदी) सरकार राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे गठण केंव्हा करणार आहे? हे त्यांनी आंदोलनकर्त्यांना सांगीतले पाहीजे. कुणबी प्रमाणपत्रा आधारे आरक्षण मिळेल काय? यासाठी मराठा आंदोलक 1884 साला पासूनच्या निजाम राजवटीतील दप्तरातील मराठा कुणबी अशा काही नोंदीचा हवाला देतात. त्या ग्राह्य धरण्यात येऊन महाराष्ट्रातील संपूर्ण मराठ्यांना सरसकट आरक्षण देण्यात यावे, अशी ते मागणी करतात. त्यासाठी राज्य सरकारने समिती नेमली. बरीच आकडेवारी काढली. परंतू मला असे वाटते की, ही मागणी परिपूर्ण नाही, कारण मराठा समाजाचा ओबीसीमधे समावेश हा मा. सर्वोच्च न्यायालयाकडून वैध ठरवला जाईल काय? हा महत्वाचा प्रश्न आहे. तसेच या मागणीचा लाभ मुठभर मराठ्यांनाच होणार. कारण निजाम राजवट ही संपूर्ण महाराष्ट्रभर नव्हती. महाराष्ट्रापुरतेच बोलायचे झाले तर ती आजच्या समराठवाड्यातील आठ जिल्ह्यात होती. म्हणून आपण 17 सप्टेंबर हा मराठवाडा मूक्तीसंग्राम दिन पाळतो. मग कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे आरक्षण मिळण्याबाबत उर्वरित महाराष्ट्रातील मराठ्यांचे काय? त्यांना कशाच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र सरकार देणार? यावर आंदोलकांनी जरूर विचार करावा असे वाटते. म्हणून मराठा आरक्षणाचे वास्तव आणि त्या मार्गावरील अडचणी लक्षात घेऊन योग्य ती संविधानिक वाट निवडावी, असे मला वाटते.



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

**जातीनिहाय जनगणना आणि आरक्षण :-** मला असे वाटते की, ज्या ज्या जाती सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या आहेत, त्यांना शिक्षणात आणि नोकऱ्यात आरक्षण आहे. पण ते अगदीच नगण्य भरल्या गले आहे. हे लक्षात येते. पण ज्या जाती सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या नाहीत, त्यांना आर्थिकदृष्ट्या गरीब मागासलेले ठरवून आरक्षण देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने काही निकष ठरवून दिलेले आहेत, त्यादृष्टीने सरकारने पाऊले उचलली पाहीजेत.

**मराठा कोण - क्षत्रिय की कुणबी? :-** तमाम मराठा बांधवांनी आधी हे ठरवावे की, जेंव्हा तो लग्नाच्या बोहल्यावर चढतो तेंव्हा तो जातीवंत मराठा क्षत्रिय कुलावतंस् असतो. तेंव्हा तो उच्च असा 96 कुलीन असतो आणि आरक्षणाच्या मागणीसाठी तो स्वतःला कुणबी प्रमाणपत्रांची मागणी करून आपलाच भाऊ असलेल्या ओबीसींच्या 27 टक्के आरक्षणात वाटा, हिस्सा मागतो. ही बाब काही मराठे बांधव आणि ओबीसी बांधवांच्या मनाला पटत नाही. म्हणून मग त्यांना असे वाटतेय की, मराठा बांधवांनी मराठा क्षत्रिय म्हणवून घेऊन ओपन मधील 50.5 टक्के मधून वाटा, हिस्सा घ्यावा. कारण जर ओबीसी मधून वाटा, हिस्सा मागीतला तर लोकसंख्येत आधीच तेंव्हाच्या 52टक्के आणि आताच्या 60टक्के च्याहि वर असलेल्या ओबीसींच्या 27 टक्क्यांमधे आधीच श्रीमंत असलेल्या मराठ्यांची ही घुसखोरी ठरणार नाही काय? बरे मराठ्यांना ओबीसी म्हणून मान्यता दिली, तर 27 टक्के आरक्षणात वाढ होईल काय? तर निश्चितच नाही. तर ओबीसीचे आरक्षण हेच लाटतील ही भिती ओबीसींना वाटतेय.

मग यावरून ओबीसी बांधव हे मराठा बांधवांना विरोध करणार नाहीत कशावरून? कारण ओबीसींना त्यांच्या हक्काचा 27 टक्क्याचा कोटा वाढवून मिळणार नाही आणि जे आरक्षण आहे ते ही सरकारकडून संपूर्ण भरल्या जात नाही. मग हा ओबीसींवर अन्याय नाही काय? तर दुसऱ्या बाजूने लोकसंख्येत फक्त 15 टक्केच असलेले ओपनचे लोक 50.5 टक्के एवढ्या मोठ्या आरक्षणाचा लाभ घेत आहेत. खरे तर 52 टक्के ओबीसींसाठी केवळ 27टक्के आरक्षण आणि 15 टक्के ओपणसाठी 50.5टक्के आरक्षण हा मा. सर्वोच्च न्यायालयाने आणलेला ‘जादूई असमतोल आकडा’ मनाला खटकतोय. त्यात पुन्हा भरीसभर म्हणजे ओबीसी समाजावर लादलेली क्रिमीलेयरची अट तर आणखीच जाचक. कारण अशी क्रिमीलेयरची अट ओपनच्या 50.5 टक्क्यांवर लादलेली नाही. मग ती ओबीसी आरक्षणावरच का लादण्यात आली? म्हणून क्रिमीलेयरची अट असंविधानिक आहे. अशा चौकटी आखून आरक्षण देणे, हे संविधानिक नाही. म्हणून या 50.5 टक्क्यांमधून मराठा क्षत्रियांना आरक्षण देण्यात यावे ही मागणी रास्त ठरू शकते यावर जरूर विचार व्हावा, असे ओबीसी बांधवांना वाटते. कारण मराठा समाज हा सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला नाही, हे वास्तव लक्षात येऊन सुद्धा सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सर्व नेते मात्र काहीही करा पण मराठ्यांना आरक्षण द्याच असे म्हणतात आणि पुढे असेही म्हणतात की, ओबीसी आरक्षणाला धक्का लावता कामा नये. म्हणून मला असे वाटते की, मराठा आरक्षण हा प्रश्न सुटण्याचा मार्ग म्हणजे केंद्रीय मोदी सरकारने महाराष्ट्रातील आंदोलनाची गांभीर्यपूर्वक दखल घेऊन तातडीने मागासवर्ग आयोग स्थापन करून मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या तसेच तो आर्थिक दृष्ट्या कसा मागासलेला आहे आणि तो आरक्षणास पात्र आहे, असा कायदा संसदेत पास करावा आणि तो मा. सर्वोच्च न्यायालयात टिकण्यासाठी विद्वत्तापूर्ण वकिलांद्वारे मांडणी करावी, हा विद्यमान मार्ग सध्या दृष्टीपथात आहे. ■ ■

# ओबीसी व महिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कृतघ्नता टाळावी, विकास निश्चित होईल!

मनुस्मृतीचे हे स्वार्थी तत्वज्ञान इंग्रजांनी ब्राम्हणाकडून हायज्याक केले. धर्म वर्चस्वासाठी परकीय सत्तेशी भटांनी नेहमी तह केला. भट उच्च कोटीचे गुलाम, पण हिंदू धर्म सत्तेचे नेहमी सुलतान राहिले. त्यांना गुलामीची झळ पोहोचली नाही. स्वातंत्र्य लढ्याशी त्यांना घेणे देणे नव्हते. राजकीय स्वातंत्र्यासाठी लढतांना सामाजिक स्वातंत्र्याचाही विचार व्हावा ही आधुनिक विचारसरणीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागणी केली. तत्कालीन पुढाऱ्यांनी फेटाळली. लढ्याचे खंदे पुढारी सामाजिक स्वातंत्र्यास राजकीय स्वातंत्र्यांतर्गत मानायचे. पण हिंदूंच्या हातात हजारो वर्षे धर्मसत्ता, राज्यसता असतांना सामाजिक स्वातंत्र्याचा विचार शंकराचार्य, संत, महंत, हिंदू पुढाऱ्यांनी कधी केला नाही हा इतिहास आहे. हिंदू विषमतावादामुळे मोगलांनी 1200 वर्षे तर ब्रिटिशांनी 150 वर्षे भारतावर राज्य केले. इंग्रज स्वतःला पुरोगामी समजायचे. पण सामाजिक सुधारणेत नेहमीच त्यांचा दुर्लक्ष राहिला. त्या वेळेस पहिले जागतिक महायुद्ध संपून दुसरे सुरु झाले. जगातील विभिन्न 16 देशावर ब्रिटिश अधिसत्ता होती. महायुद्धात ब्रिटिशांची फार हानी झाली. शिवाय पहिल्या महायुद्धानंतर कोणत्याही देशाने दुसऱ्या देशावर अधिसत्ता गाजवू नये असा संयुक्तपणे जागतिक करार झाला होता. त्यावर ब्रिटिश राजाची स्वाक्षरी होती. भारतीय मवाळ, जहाल पक्षांचा स्वातंत्र्य संग्राम सुरू असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिशांकडे तसेच हिंदू पुढाऱ्याकडे सामाजिक स्वातंत्र्याची मागणी केली. सर्वांना विचार करण्यास बाध्य केले. गोलमेज परिषदा, ब्रिटिश कमिशनापुढे साक्ष देऊन डॉ. आंबेडकरांनी सामाजिक स्वातंत्र्याला बळकटी दिली. परिणामी ब्रिटिशांनी देशाला स्वातंत्र्य देऊ केले. पण त्यापूर्वी भारताचे संविधान निर्माण करण्याची अट टाकली.

**विद्या व्यासंग**



प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतेतून एकता साधणारे सर्व समावेशक असे जगातील सर्वात मोठे समताधिष्ठित जागतिक किर्तीचे प्रगतिशील समतेचे संविधान निर्माण केले. संविधानाद्वारे प्रत्येक प्रौढास एका मताचा अधिकार दिला. समता, समानता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुभाव या तत्वावर देशाची उभारणी केली. सर्वांना जीवन जगण्याचे, विकासाचे, शिक्षणाचे, राष्ट्रिय प्रवाहात येण्याचे समान हक्क दिले. कायद्याने स्त्रियांचे भोगदासित्व नष्ट केले. स्त्रीला पुरुषासारखे समान हक्क दिले स्त्री-पुरुष भेद नष्ट केला. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, स्वास्थ, व्यापार, उद्योग, सुधारणेच्या, विकासाच्या सर्वांना समान संधी मिळतील याची संविधानात तरतूद केली. हे विश्वमान्य, विश्वविख्यात मानवी मुल्य जपणारे संविधान मनुस्मृतीला म्हणजे ब्राम्हणी सत्तेला हादरा देणारे असल्याचे कुपमंडूक भटांनी ठरवले त्यातून ह स्वयंघोषित हिंदूश्रेष्ठीच्या अधिकाराला छेद गेला. स्त्रियांवरील त्यांची पकड कमी झाली. षुरुषावरचे अधिकार गेले. अधिकारासाठी ते बेभान झाले. त्यांनी स्वातंत्र्याचा, तिरंग्याचा, संविधानाचा, राष्ट्रध्वजाचा, राष्ट्रगीताचा विरोध केला. राजस्थानची राजधानी जयपूरच्या न्यायालयासमोर स्त्रियांना भोगदासी ठरवणाऱ्या मनुस्मृतीच्या मनूची प्रतिमा स्त्रीयांच्या पुढाकारात बसवली. धर्मांधतेतील स्त्रियांची ही केवढी विडंबना! अज्ञानात गुरफटल्या ब्राम्हणेतर पुरुष-स्त्री समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या मार्गाने विकासाच्या वाटेवर आणले, सन्मानाचे स्थान मिळवून दिले. इमाव समाज आणि देशातील स्त्रिया या जन्मात तरी डॉ. बाबासाहेबांचे ऋण फेडू शकत नाही. त्यांनी ब्राम्हणी बुजगावण्याला का भ्यावे? ‘ये रे माझ्या मागल्या’ सारखे का वागावे? केवढी ही कृतघ्नता! अनाडीपणा ही समाजाची खरी समस्या नाही. शिकले सवरले स्वार्थांध होऊन विरोधकांच्या समर्थनासाठी आपल्या प्रतिभेचा उपयोग करतात ही खरी समाजाची समस्या आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वार्थ, देशाचा नुकसान शिवला नाही. त्यांनी देशवासीयांना समस्येवर विचार करावयास शिकवले. स्वातंत्र्यापूर्वी; माणसाचे मनुष्यत्व नाकारणारी स्त्रियांना षुरुषाची मनोरंजनाची वस्तू माणणारी मनुस्मृती देशाचे संविधान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या मनुस्मृतीचे चटके भोगले त्यांनी मनुस्मृतीचे सार्वजनिक दहन करून सर्वांना स्वातंत्र्याची समान संधी मिळवून दिली. अंधःकारातून मुक्त करणारे परिवर्तनवादाची, विज्ञानवादाची, वास्तववादाची बैठक असणारे संविधान देशाला दिले. या संविधानाला नाकारणारे राष्ट्रद्रोही, देशद्रोही, आतंकी देशात आहेत. त्यांचा बंदोबस्त आज ना उध्या सरकारला करावाच लागेल सरकारने नाही केले तर समाज करेल. ‘मरता क्या नहीं करता’ अशी पाळी बहुजन व स्त्रीयावर येऊ नये म्हणजे झाले. देशाचे स्वातंत्र्य 78 वर्षाचे वयोवृद्ध झाले. पण संविधान व संविधानाने दिलेले अधिकार देशाच्या कान्याकोपऱ्यातील माणसापर्यंत पोहोचले नाही. यास जबाबदार कोण? आंबेडकरी अनुयायांनी समाज सुधारणा मोहिमेत नेहमी आदिवासी, इमाव महिलां अत्याचार निर्मूलनाचा समावेश केला. आदिवासी, इमावचे पुढारी स्वतःच्या पुढाकारात जनजागरण करण्यात मागे का? समाजात अनेक धुरंधर, पुढारी, नेते, समाज सुधारक आहेत. ते आयत्या मंचावर चढतात. बहुजनांना, आदिवासींना सूज, जागृत करण्यासाठी स्वतःचा मंच तयार करीत नाही की धडपड करीत नाही. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी, संविधानाशी समाजाशी कृतघ्न का झाले? महामनी भ. बद्ध, म. जोतिबा फुले, माता सावित्री, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, राष्ट्रसंत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज समाजाला आशेची किरणे आहेत. समाज सुधारकांनी, नेत्यांनी, समाज पुढाऱ्यांनी आपली अस्मिता ओळखावी. पदकांसाठी, खूर्चीसाठी स्वार्थासाठी समाजाशी फितुरी करू नये. जे आवळा देऊन भोपळा काढण्यासाठी अडाणी समाज ब्राम्हणांच्या दाविला बांधतात ते संविधानाशी, समाजाशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी कृतघ्न झाले. विकले गेले. त्यांनी फक्त स्वार्थ साधला. दहा देश मुलनिवासींचा, आदिवासींचा आहे. जल, जंगल, जमीन खनिज त्यांची संपत्ती आहे. निसर्गाशी जुळले राहणे त्यांची संस्कृती आहे. त्यांना वनवासी करून; शहरी समाजापासून 7/12 पासून त्यांना वंचित करण्याचा डाव हाणून पाडला जाईल. सरकारांनी त्यांच्या विकासाला प्रमाण धरून 78 वर्षात नियोजनात्मक योजना केल्या नाही. पुढाऱ्यांनी शासनानी सुद्धा त्याचेही कृतघ्नपणा केला. आजही आदिवासी राष्ट्रीय प्रवाहात नाही लागतात. मुलनिवाशीयांशी केलेली फितुरी पचणार नाही. केल्याचे फळ प्रत्येकाला याच जन्मा मिळतात, भोगावे लागतात. ■ ■

# सरदार पटेल : सनातनी संघसंरक्षक

या संदर्भात अनेक दाखले समकालीन लेखकांच्या लिखाणात तसेच श्री. दुर्गा दास यांनी संकलित केलेल्या SARDAR PATELÓS CORRESPONDENCE खंड 6 मध्ये आढळून येतात. सन 1946 सालात रा. स्व. संघाच्या हिंसक कारवाया देशभरात वाढू लागल्या होत्या व रा. स्व. संघ देशभरातल्या त्यांच्या गुप्त कार्यालयामध्ये शस्त्रे जमा करीत असल्याच्या बातम्या येत होत्या. या आधारे तत्कालीन सेंट्रल असेंब्लीचे एक सदस्य अहमद ई.एच. जाफर यांनी असेंब्लीत 11 फेब्रुवारी 1947 रोजी तारांकित प्रश्न क्र. 178 उपस्थित केला आणि विचारले की, (अ) आरएसएसच्या कारवायांची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव सरकाच्या विचाराधीन आहे काय? (ब) आरएसएसच्या अलिकडच्या कारवायांबद्दल सरकारला काही माहिती मिळाली आहे काय? (क) संघाच्या संपूर्ण भारतात शाखा आहेत काय?

या प्रशांचे उत्तर देताना सरदार वल्लभभाई पटेल यांनी सांगितले की, (अ) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कारवायांची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा सरकारचा कोणताही हेतू नाही. (ब) नाही. (क) संघाच्या अनेक प्रांतांमध्ये शाखा आहेत. (KR Malkani – The RSS story पृष्ठ 45-46) सदर उत्तरावरून लक्षात येते की, आरएसएसच्या देशविघातक कारवायाकडे सरदार पटेल हे दुर्लक्ष करीत होते व एक प्रकारे त्यांना अभय देत होते.

यानंतर ‘फाळणीनंतरच्या काळात केंद्र सरकारने पाकिस्तानी हल्लेखोरांविरुद्ध लष्कर उभारण्यासाठी काश्मिरात काही युद्धसामग्री पाठवली, ती संघाने मधल्यामध्ये हस्तगत केली. ही बातमी सरदार पटेलांना कळविण्यात आली होती. पण काही झाले तरी पटेलांना संघाचा रोष स्वतःवर ओढवून घ्यायचा नव्हता. यामुळे त्यांनी या प्रकरणात कोणतीही कारवाई केली नाही. नोव्हेंबर 1947 मध्ये दिल्ली पोलीसांच्या गुप्तचार खात्याने काहीतरी भयंकर घडणार असल्याची खबर पटेलांना दिली होती. पण त्यांनी त्याचीही योग्य ती दखल घेतली नाही. (मनुचा मासा लेखक प्रा. कृ. ल. महाले लोकवाङ्मय गृह प्रकाशन पृष्ठ 89)

6 जानेवारी 1948 रोजी लखनौ येथे भाषण करताना सरदार पटेल म्हणतात, ‘काँग्रेसमध्ये प्रबळ असलेल्या काही नेत्यांना वाटते की त्यांच्या अधिकाराच्या जोरावर ते संघाला चिरडून टाकू शकतील. ‘दंडा’ वापरून तुम्ही एखाद्या संघटनेला चिरडून टाकू शकत नाही. ‘दंडा’ हा चोर आणि दरोडेखोरांसाठी आहे. संघाचे लोक काही चोर आणि दरोडेखोर नाहीत. ते देशभक्त आहेत जे त्यांच्या देशावर प्रेम करतात.’ (KR Malkani – The RSS story पृष्ठ 48) यावरून रा. स्व. संघाप्रति असलेल्या त्यांच्या जवळीकीचा प्रत्यय येतो. या भाषणानंतर नेहरूंनी सरदार पटेलांना सरकारातून वगळण्याचा निर्धार केला आणि त्याला गांधीजींची संमतीही मिळविली. यामुळे पटेल गांधीजींवर नाराज झाले होते. पण माऊंटबॅटननी पटेलांना मंत्री मंडळातून वगळू नये असा आग्रह केल्यामुळे नेहरूंचा निर्धार मावळला.’ (महाले पृ. 90) गांधींचा खून झाल्यानंतर संघाच्या कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरू झाली. यात संघाचे एक प्रमुख नेते एकनाथ रानडे यांच्या अटकेचाही हुकूम निघाला होता. मात्र त्यांच्यावर वॉरंट असतानाही रानडे यांनी जी. डी. बिर्ला यांच्या घरी सरदार पटेल यांची भेट घेतली.( या भेटीत झालेल्या चर्चेचे सविस्तर वर्णन KR Malkani – The RSS story या पुस्तकाच्या पृष्ठ क्र. 57 वर पहावे) पटेल त्यावेळी गृहमंत्री आणि उप प्रधानमंत्री असूनही त्यांनी रानडे यांच्याबाबत पोलिसांना कोणतेही आदेश दिले नाहीत. यासंदर्भात मनुचा मासा या ग्रंथाचे लेखक




प्रा. कृ. ल. महाले म्हणतात की, ‘या भेटीत पटेलांनी संघाला सरकारमध्ये सामील होण्याचे आमंत्रण दिले व यापुढे दंगे घडवून आणू नका असे सांगितले. (महाले पृष्ठ 90) यानंतर एकनाथ रानडे यांनी पटेलांची मसूरी येथे पुनः भेट घेतली. या भेटीचे वर्णन करताना के. आर. मलकांनी लिहितात, की रानडेना भेटणीसाठी पटेल उत्सुक होते. पटेलांनी रानडे यांना सांगितले की, ‘तुम्ही याबद्दल (सरकार मध्ये सामील होण्याच्या प्रस्तावाबद्दल?) काय विचार केला आहे? आरएसएसवर बंदी आहे. पण ही बंदीं काही कायमची नाही. काँग्रेसवरही अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. बंदीमुळे कोणतीही संघटने नष्ट होत नाही. आरएसएसवरील ही बंदी लवकरच किंवा काही कालावधीनंतर उठवली जाईलच. प्रश्न असा आहे की, पुढे काय? एकनाथजींनी त्यांना संघाची भूमिका समजावून सांगितली आणि संघ हिंदूंचे संघटन आणि हिंदू संस्कृतीचे संवर्धन यावर विश्वास ठेवतो असे म्हटले. त्यावर सरदार म्हणाले, ‘तुम्हाला असे का वाटते का मी वेगळा विचार करतो?’ एकनाथजीं म्हणाले की, सर्व काँग्रेसी तुमच्यासारखा विचार करत नाहीत. त्यावर सरदार म्हणाले, ‘मी आज जे बोलतो ते उद्या संपूर्ण काँग्रेस म्हणेल.’ ते म्हणाले, ‘नेहरूंसारखे काही बंधू (चार भाई) आहेत जे वेगळा विचार करतात आणि जे हिंदूंची संघटना आणि संस्कृतीच्या नावाने चिडतात, पण तेही येतील. मुद्दा असा आहे की, तुम्ही माझे हात बळकट कराल का? एकनाथजींनी त्यांना सांगितले की जर तसे झाले तर ते त्यांच्याशी हातमिळवणी करण्यास आनंदाने तयार होतील. KR Malkani – The RSS story पृष्ठ 57 ) या भेटी नंतर नेहरूंचा आणि गुप्तचर खात्याचा विरोध डावलून दि. 12 जुलै 1949 रोजी पटेलांनी आरएसएस वरील बंदी उठविण्याचे आदेश जारी केले. यानंतर नेहरू इंडोनेशियाला गेले असताना नेहरूंच्या गैरहजेरीत पटेल आणि गोळवलकरांची भेट झाली. या भेटीनंतर सरकारने जातीय संघटनांविरुद्ध कारवाई करण्यासाठी घटना समितीने संमत केलेले राज्यघटनेतील बदल रद्द केले. पटेल आणि आरएसएस यांना कोणत्याही स्थितीत नेहरूना सत्तेतून व काँग्रेस पक्षातून बाहेर काढायचे होते. त्यासाठी काँग्रेसमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला अनुकूल असलेला गट सातत्याने प्रयत्न करीत होता. या रणनीतीचा भाग म्हणून पटेलांनी त्यांचे प्यादे असलेले संघाला अनुकूल कट्टर हिंदुत्ववादी असलेले पुरुषोत्तमदास टंडन यांना काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आणले. त्यानंतर काही काळातच डिसेंबर 1950 मध्ये सरदार पटेल यांचा मृत्यू झाला. यामुळे काँग्रेस पक्षातील संघधार्जिण्या गटांचे मनसुबे उधळले गेले. नेहरूंनी परत काँग्रेसवर जम बसविला आणि यानंतर टंडन यांना काँग्रेसचा आणि अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. (महाले पृष्ठ 100) वरील सर्व वस्तुस्थिती पाहिली तर सरदार पटेल यांच्या लोहपुरुष प्रतिमेमागे दडलेला त्यांचा सनातनी हिंदुत्ववादी चेहरा ठळकपणे सामोरा येतो. पटेलांच्या या संघधार्जिण्या भूमिकेमुळे रा. स्व. संघ भाजप त्याना आपला आयकॉन मानतो हे लक्षात घेतले पाहिजे. ■ ■



सुनील खोब्रागडे
मो. 9594057373

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त सोयी सुविधा पुरविण्याबाबत व म. शासनाची उदासीनता

दरवर्षीप्रमाणे नागपूरात 14 अक्टूबर 2025 रोजी नागपूरात धम्मचक्र परिवर्तन दिनाचा कार्यक्रम होत आहे. लाखो भाविक देशपरदेशातून दिक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नमन करण्यासाठी येत असतात. त्यानुसार येणाऱ्या लाखो भाविकांसाठी दिक्षाभूमी येथे आवश्यक सुखसुविधा, पिण्याची पाण्याची व्यवस्था, स्थानगृहे, तात्पुरते संडास बांधकाम उभारणे शासनाचे महत्वाचे कार्य आहे. अजुनही शासन गाढनिद्रेत असल्यामुळे विविध धार्मिक संघटनेद्वारा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून शासनाला लेखी निवेदन देण्यात आले. याउलट गणेश चतुर्थीला म. शासनाने हिंदूना खुष ठेवण्यासाठी विशेष निधी मंजूर करून आवश्यक सोयी पुरविण्याबाबत मुख्यमंत्री पातळीवरून विशेष आदेश काढले आहेत. धम्मचक्र परिवर्तन फक्त बौद्ध बांधवांचा कार्यक्रम आहे, असे समजून महाराष्ट्र शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित आहे. दरवर्षी दिक्षाभूमीवर येणाऱ्या देशपरदेशातील बौद्ध बांधवांच्या संख्येत दुप्पटीने वाढ झाली आहे. त्याप्रमाणात दिक्षाभूमीवर आवश्यक सुखसुविधा पुरविण्यात शासन गाढनिद्रेत आहे. स्थानिक प्रशासन म्हणजे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, पोलीस आयुक्त, म.न.पा. प्रशासन, नागपूर यांनी नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी पूर्वतयारी सुखसुविधा देण्याबाबत विशेष बैठक घेऊन सुखसुविधा देण्याबाबत विशेष निर्देश देण्यात यावे. कारण सुखसुविधा पुरविणे हे शासनाची विशेष जबाबदारी आहे. ■ ■

- ॲड. बाबू मेश्राम
नागपूर.

“ स्वत:वर विश्वास ठेवा, जग तुमच्यावर विश्वास ठेवेल. ”



*23 ऑगस्ट 2025 रोजी 'गोवा बार असोसिएशन' च्या सभेला संबोधित करतांना भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले कि, उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअरच्या माझ्या निकालामुळे 'माझ्याच समाजाच्या टीकेचा मी धनी झालो आहे.' एक वर्षापूर्वी दिलेल्या वरील निर्णयामुळे आंबेडकरी समाजात संभ्रम आणि असंतोष होता. त्यासाठी आंदोलन झाले होते.*



# क्रिमीलेअर एक षडयंत्र

23 ऑगस्ट 2025 रोजी बहुजन सौरभमध्ये प्रकाशित माजी न्यायाधीश अनिल वैद्य यांच्या संशोधनात्मक लेखातून 'अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअर' या विषयाची कल्पना स्पष्ट होते. बहुजन सौरभने सुद्धा या विषयावर अग्रलेख लिहून अनुसूचित जातीजमातींना क्रिमीलेअर लावण्याच्या षडयंत्राकडे समाजाचे लक्ष वेधले. वरील लेखांतील माहिती अनुसूचित जाती जमातींच्या जनतेच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे.

'दलविंदसिंग विरुद्ध पंजाब' प्रकरणात 1 ऑगस्ट 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण गवई यांनी अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाचा निर्णय देताना त्यांना क्रिमीलेअर लागू करावा असे अनाकलनीय मत मांडले. न्यायाधीश पंकज मित्तल यांनी 'एका पिढीने आरक्षण घेतले तर दुसऱ्या पिढीने घेऊ नये' असे मत नोंदविले. वास्तविकता अनुसूचित जातींना क्रिमीलेअरचा मुद्दाच कधी संविधानपीठासमक्ष नव्हता. 1 ऑगस्ट रोजी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअर लावण्याचा निवाडा सात पैकी दोन न्यायाधीशांनी दिला. मग बाकीच्या 5 न्यायाधीशांचा निर्णय काय होता हा मुद्दा दुर्लक्षित आहे. सरन्यायाधीश गवई म्हणतात की, मुंबई आणि दिल्लीतील सर्वात चांगल्या शाळांमध्ये शिकणारा, प्रत्येक सोयी सुविधा घेणाऱ्या मुलाची बरोबरी ग्रामीण भागातील मजुराचा मुलगा जो जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकतो, तो करू शकेल काय? म्हणून त्यांच्या मते क्रिमीलेअर आवश्यक आहे. परंतु येथे न्यायाधिशांनी दिल्लीतील शिकणारा मुलगा आणि मजुराचा मुलगा दोघांनाही अस्पृश्यतेचा समान दर्जा मिळाला आहे, याचा विचार केला नाही. जातीवादी मानसिकता असणारे लोक श्रीमंत महार वा गरीब महार असा भेद करत नाही. 2 ऑगस्ट 2025 रोजी टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रकाशित लेखात न्या. गवईंना Dalit Judge म्हणून संबोधले आहे. या लेखात पहिले दलित सरन्यायाधीश म्हणून न्या. के. जी. बालकृष्णन यांचा सुद्धा उल्लेख आहे. भारताच्या सरन्यायाधीश पदी असलेल्या व्यक्तिला 'दलित' म्हणून संबोधले जात असेल तर ही जाती आधारित भावना भेदभावाची प्रतिक नव्हे काय? आजही शहरात सोसायटीमध्ये घर भाड्याने किंवा विकत घेतांना प्रथम जात विचारली जाते. महार हे श्रीमंत असो व गरीब दोघेही जातीयतेचे बळी ठरतात, याचा न्यायाधिशांनी विचार केलेला दिसत नाही.

खुल्या प्रवर्गात सर्व सुखसोयी भोगणारा मुलगा आणि अस्पृश्यतेचे चटके सहन करून सचिव पदावर गेलेला मुलगा यांची तुलना होऊ शकत नाही. तुलना करायची असेल तर खुल्या प्रवर्गातील मुलांना सुद्धा क्रिमीलेअर का लागू करण्यात येऊ नये? अलीकडे काहींनी सर्वोच्च न्यायालयात अनुसूचित जाती जमातींना क्रिमीलेअर लावण्यासाठी याचिका दाखल केली. यासाठी क्रिमीलेअर लावण्याची फार घाई झाली आहे, परंतु आजपर्यंत नोकऱ्यात, पदोन्नतीचा अनुशेष भरला नाही यावर कोणी बोलत नाही. याशिवाय खाजगी कंपन्यामध्ये वंचितांना कोणतेही आरक्षण नाही. अनुसूचित जातींचा मुलगा कितीही लायक असला तरी काहीतरी त्रुटी काढून त्यांची निवड रद्द केली जाते.

वास्तविक मागासवर्गीयांना लागू करण्यात आलेल्या आरक्षणाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेतून मागोवा घेणे गरजेचे आहे. तत्कालीन अस्पृश्यांवर लादलेली गुलामगिरी, पदोपदी होणारा अन्याय-अपमानाचे निर्मूलन करण्यासाठी आरक्षण हा डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचा भाग होता. 1919 मध्ये साऊथ ब्यूरो कमीशन असो वा गोलमेज परिषद, डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्य, महिला व मागासवर्गीयांच्या मतदानाची, शिक्षणाची मागणी केली होती. 1949 मध्ये घटनाकारांनी आरक्षण देतांना अनुसूचित जातीजमातींच्या आर्थिक व्यवस्थेचा विचार केला नव्हता. परंतु या देशात हजारो वर्षापासून मनूस्मृती नुसार जातीच्या आधारावर भेदभाव झाला आहे. विषमतावादी श्रेणीबद्ध चातुर्वर्ण्य समाज व्यवस्थेमुळे भारतीय समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रचंड विषमता निर्माण झाली होती. ही तफावत दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आजीवन संघर्ष केला. हा दृष्टीकोन लक्षात घेता आरक्षण हे सामाजिक स्थैर्य आणि संधीची समानता प्राप्त व्हावी म्हणून आरक्षण लागू केले होते. अर्थात आरक्षण हा आर्थिकतेचा वा भाकरीचा प्रश्न नव्हता, नाही तर तो वंचितांना त्यांचे मानवी मूल्ये वा हक्क प्राप्त करून देण्याचा होता.

संविधानातील अनुच्छेद 16 नुसार सर्व भारतीयात संधीची समानता प्रस्थापित करण्याचे निर्देश दिले आहेत. अनुच्छेद 16 (4) नुसार अनुसूचित जाती जमातींच्या पर्याप्त प्रतिनिधीत्वाचा राज्यांनी प्रथम विचार करण्यास सुचविले आहे. असे असले तरी आजही जातीयता, विषमतावादी व्यवस्था कार्यरत आहे. त्याचे केवळ स्वरूप बदलले आहे. हिंदूंच्या देवदैवांचा त्याग केल्यामुळे बौद्धांना टोकाचा द्वेष सहन करावा लागतो. बौद्ध समाजाची जी थोडी फार प्रगती झाली आहे, हीच उच्चवर्गीयांची खरी पोटदुखी आहे. त्यातून अत्याचाराच्या घटना घडत आहेत. मनूस्मृतीप्रमाणे अनुसूचित जातीजमातींना अवर्ण ठरल्या होत्या. महाराष्ट्रात 59 जातींच्या समुदायाला एकसंघ ठेवण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी अनुसूचित जातीचा प्रवर्ग तयार केला. आज त्याच संवैधानिक अनुच्छेदांना केराची टोपली दाखवली जात आहे. या प्रवर्गातील मुलगा लायक असूनही त्याच्या शैक्षणिक वा नोकरीच्या संधी नाकारण्याचा वरील निर्णय म्हणजे सरकारी षडयंत्र होय. देशातील जो समाज हजारो वर्षापासून लाभार्थी आहे. सर्व साधन संपती आणि उच्चपदस्थ नोकऱ्यांवर कुंडली मारून बसला आहे, त्यांना प्राधान्याने क्रिमीलेअर लावण्याचा विचार न्यायालयाने केला पाहिजे. एकंदरीत अनुसूचित जातींचे वर्गीकरण आणि क्रिमीलेअर हे एक षडयंत्र आहे. त्याचा एकजुटीने प्रतिकार करणे गरजेचे आहे. ■ ■



श्रीराम बनसोड
8208617748

# 'मनोरमा' निष्ठावंत आंबेडकरी आई

**आंबेडकरी चळवळीत हिरीरीने सहभागी होणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या, प्रेमळ-मनमिळावू स्वभावाच्या धनी, सर्वांच्या सुखदुःखात धावून जाणारी मायमाउली मनोरमाताई घाटे यांची आज, 2 सप्टेंबर रोजी अमृतमहोत्सवी जयंती त्यानिमित्ताने...**

आंबेडकरी चळवळीतील झुंजार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ॲड. सुरेशराव घाटे यांच्या सहचारिणी आदरणीय मनोरमाताई यांचा जन्म बुधाजी आणि आई कासाबाई पैक यांच्या पोटी नागपुरात 2 सप्टेंबर 1950 रोजी झाला. मनोरमाताईंचे वडील बुधाजी एम्प्रेस मिलमध्ये कर्मचारी होते. आई कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या. संसाराचा भार वाहून त्या घरीच विडी बनविण्याचे काम करायच्या. आजारपणामुळे वडिलांची नोकरी गेल्यानंतर घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली. परिस्थितीशी दोन हात करीत मनोरमाताईंनी पदवीपर्यंतचे उच्च शिक्षण घेतले. भानखेडा परिसरात त्यांनी लहान मुलांच्या शिकवणी वर्गाला सुरुवात केली. सोबतच हरिदास टेंभुर्णे यांच्या लायब्ररीत त्या काम करू लागल्या. बी.एस.डब्लू. झाल्यानंतर 1976 साली त्या महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळामध्ये कामगार कल्याण अधिकारी म्हणून मुंबई दादरच्या नायगाव येथील कार्यालयात रुजू झाल्या. मनोरमाताईंचा ॲड. सुरेश घाटे यांच्यासोबत 14 ऑक्टोबर 1978 रोजी विवाह झाला. त्यांना आशिर्वाद देण्याकरिता राजा ढाले आणि विदर्भातील पँथर कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. लग्नानंतर त्यांची वर्धा येथे बदली झाली. तिथे चार वर्षाच्या वास्तव्य काळात त्यांचे आंबेडकरी समाजातील कार्यकर्त्यांसोबत स्नेहाचे मधुर संबंध निर्माण झाले. मनोरमाताईंना संतानप्राप्ती झाली नाही, याचे दुःख त्यांनी कधीच जाणवू दिले नाही. समाजातील गोरगरीब समाजबांधवांची मुले हीच आपली संपत्ती समजून उभय पती-पत्नीने त्यांच्या शिक्षणासाठी सावित्री-जोतिबासारखे कार्य केले. मुलबाळ नसल्याने दोघांनीही सहमतीने 'मानसी' नावाची कन्या श्री श्रद्धानंद अनाथालयातून कायदेशीर न्यायमूर्ती सुकरे यांच्या आदेशाने दत्तक घेतली.

1982 साली मनोरमाताईंची बदली नागपूरला झाली. कॉटन मार्केट स्थित विभागीय कार्यालयात त्या रुजू झाल्या. 1983 साली 'कामगार विकास अधिकारी' बनल्यानंतर त्यांची पुणे पिंपरी चिंचवड येथील अण्णासाहेब मगरमध्ये त्यांची बदली झाली. 1985 साली मुंबईच्या अंधेरी व विक्रोळी कार्यालयात रुजू झाल्या. एक वर्षानंतर अकोला येथील डबकी रोड कार्यालयात नेमणूक झाली. ज्या ज्या ठिकाणी त्यांची बदली झाली. त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आणि सामाजिक बांधिलकी मोठ्या निष्ठेने जपली. वर्धेच्या वास्तव्य काळात त्यांनी महिलांना संघठीत करून घरगुती उद्योगाकरिता प्रोत्साहित केले. दलित रंगभूमीच्या कलाकारांना स्टेजवर आणले. या पदावर असताना मिल कामगार परिवारांना आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाकरिता भरीव कार्य केले.

त्या काळात दलित पँथरची चळवळ मोठ्या जोमात होती. पती सुरेशराव आपल्या पगाराचा मोठा वाटा आंबेडकरी चळवळीवर खर्च करायचे. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात त्यांनी स्वकष्टाने मिळविलेली अपार धनसंपदा खर्च केली. 1979 साली नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवरून 'लाँग मार्च' निघाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर नामांतर आंदोलनाचा वणवा पेटला होता. 'लाँग मार्च' जेव्हा वर्धेत पोहोचला तेव्हा रामकृष्ण भगत, जिंदा भगत, यशवंत भगत, बाबा डोकस, भुजंग जिंदे, नागोराव पाटील यांच्या जेवणाची आणि राहण्याची उत्तम व्यवस्था घाटे परिवाराने केली होती. मुंबईच्या वास्तव्यात मनोरमाताई मोराईजी देसाई मिलच्या समोर परळ रेल्वे क्वार्टरमध्ये राहत होत्या. पती सुरेश घाटे चळवळीत सक्रिय असल्यामुळे थोर आंबेडकरी साहित्यिक राजा ढाले, रतनकुमार, पाटीलपुत्र, पँथर भाई संसारे, रामदास आठवले, चिंतामण गांगुर्डे, रमाकांत गवळी, दिवाकर रोजवळ, किसन माने, वसंतराव गायकवाड सोबतच इतर कार्यकर्त्यांसोबत त्यांचे मित्रत्वाचे अतूट नाते निर्माण झाले. पँथरच्या कार्यक्रमाला आणि कार्यकर्त्यांनाही वेळोवेळी त्या आर्थिक मदत करायच्या. आंबेडकरी गायक प्रल्हाद शिंदे, श्रावण यशवंते आदींना मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे प्रचार करायच्या.



मिलिंद मानकर
मो. 8080335096



भिमा कोरेगावला नागपूरच्या शहीद सैनिकांना वैदर्भीय आंबेडकरी जनतेकडून मानवंदनेचा मुजोरा देण्यात सुरुवात केली. विदर्भातील असंख्य कार्यकर्ते व जनता दरवर्षी 1 जानेवारीला भिमा कोरेगावला जाऊ लागली. सन 1985 ते 2005 पर्यंत मनोरमाताईंनी सहाय्यक कल्याण आयुक्त या पदावर अंधेरी एलिफन्स्टन रोड व सहा वर्षे अकोला येथे काम केले. सन 2005 ते 2006 मध्ये त्या 'उपकल्याण' आयुक्त' बनल्या. पदोन्नती मिळविताना त्यांना प्रचंड कठोर संघर्ष करावा लागला. मनोरमाताईंची अतूट आंबेडकरी निष्ठा व स्नेहभावामुळे 2006 साली मा. रामदास आठवले यांच्या हस्ते ललित कला, इंदोरा येथे जाहीर सत्कार करण्यात आला. दीर्घकालीन सेवाकाळात त्यांना असंख्य स्मृतिचिन्हे, मानपत्रे देऊन त्यांना गौरविण्यात आले. मनोरमाताई 2008 साली सेवानिवृत्त झाल्या. आपल्या संपूर्ण सेवाकाळात त्यांनी निरपेक्ष भावनेतून आणि ताठ मानेने सेवा बजावली. समाजसेवेत रत असतानाच 2 मार्च 2013 रोजी मनोरमाताई अनंतात विलीन झाल्या. तरी आपल्या पुण्यकर्माने त्या आजही आपल्यात आहेत. पती सुरेशराव यांनी पत्नीच्या विरहाचे दुःख जाणवू दिले नाही.

आज त्यांची काया जर्जर झाली असली तरी मनाने अगदी ते 'सदाबहार' आहेत. वयाची 80 पार केलेल्या सुरेशरावांच्या उत्साह आजच्या तरुणांना लाजवेल असाच आहे. गोरगरिबांच्या मदतीला ते क्षणाचाही विलंब न करता धावून जातात. प्रत्येक आंदोलनात हिरीरीने सहभागी होतात. अशी आदर्श आंबेडकरी आई, समाजभूषण, सुरेशरावांच्या सहचारिणी मनोरमाताई घाटे यांना अमृतमहोत्सवी जयंतीनिमित्ताने मनोभावे त्रिवार वंदन. मानाचा मुजरा. ■ ■



# घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा?

तुम्ही बौद्ध आहात काय? तुम्ही स्वतःला बौद्ध समजता पण आचरण कसे करता. बुद्धाच्या पाया पडून पुजा केली पाहिजे की प्रचांग प्रणाम? किती लोकांना यातील फरक माहिती आहे. म्हणूनच आज मी आपल्यासमोर घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा हे सांगण्यासाठी उभा आहे. भांडुप विभागातील धम्म उपासिका महिला संघाच्या बैठकीत सागर तायडे धम्म प्रचारक घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा? याबाबत ते बोलत होते. घरात बसून बुद्ध उत्सव साजरा केला तर त्रिसरण, पंचशील यांचा अर्थ समजून घेता येईल आणि त्यांचे आचरण घरातून सुरू झाले तर तुम्ही कुठेही गेला तर ते संस्कार आपण विसरुच शकत नाही. हे संस्कार नसल्यामुळेच बुद्ध विहारे परिवर्तनांचे केंद्र झाले नाही. कारण विहिरीत नाही तर पोहऱ्यात कुठून येणार. दुःख आहे, त्याला कारण आहे. त्यांचे निवारण करण्यासाठी उपाय सुद्धा आहे. त्यासाठी बुद्धांनी दाखविलेल्या मानवमुक्तीच्या मार्गाने आपणांस जावे लागेल. सात दिवस घरात बुद्ध उत्सव साजरा केला तर अनेक समस्यांचे निवारण करता येते. कसे ते समजून घेणे महत्वाचे असते. यानिमित्ताने मित्रमंडळी हितचिंतक नातलगांना आपल्या घरी बोलवा. त्यांनी घरातील वातावरण पाहिल्यावर हमखास कुटुंबातील व्यक्तीची चौकशी केल्याशिवाय राहणार नाहीत. मग मुलामुलींचे शिक्षण, नोकरी आणि लग्न यांची माहिती विचारल्याशिवाय घरी आलेला माणूस शांतपणे जाऊच शकत नाही. हीच बुद्धांच्या विचारांची शक्ती आचरणातून दिसते. तीच सर्वश्रेष्ठ आचरण इतरांस प्रेरणादायी व लक्षवेधी ठरते. बुद्ध उत्सव घरात साजरा करणे निश्चितच हे एक लहान वाटणारे पण महान कार्य आहे. यातून बौद्ध उपासक प्रेरणा घेऊन आपल्या घरी दररोज वंदना घेऊन आपल्या मुलांवर, नातूनातवांवर संस्कार करतील की आपण बौद्ध आहोत. बौद्धांच्या आचारसंहितेचे पालन केले पाहिजे. त्याने त्यांना धम्माचे संघांचे महत्व पटल्याशिवाय राहणार नाही.

जगातील एकशे चाळीस देशात सम्राट अशोककालीन बुद्ध उत्सव घरात साजरा केला जातो. त्यामुळे त्या देशातील धम्म उपासकांची सर्वच क्षेत्रात प्रगती होत आहे. आपले आपल्या जिल्ह्यातील गांवचे काय? डॉ. बाबासाहेबांनी सांगितले होते खेडे सोडा, शहर गाठा. गावात लाचारीने मिळणारी भाकरी आणि शहरातील स्वाभिमानाने मिळविलेली कष्टाची भाकरी फरक पडला की नाही. जगातील बुद्ध धम्माचे उपासक हेच आचरण करत आहे. पण ते आपणास कळत नाही, कोणी सांगत असेल तर त्यावर आपण विश्वास ठेवत नाही. वंदना घेत नाहीत. अनेक लोक बौद्ध तत्वज्ञानाचा लाभ घेतात. पण बुद्धाला वंदन करत नाहीत. आपले तसे नाही. संपूर्ण विश्व सुखी व्हावे हे आपले उद्दिष्ट आहे. ज्यामुळे सर्व सुखी होतील. पण घरात आपण शुद्ध बुद्ध नसलो तर बाहेर आपली ओळख काय करून ठेवली यांचे आत्मचिंतन करण्यासाठी घराघरात सम्राट अशोककालीन बुद्ध उत्सव घरात साजरा केला पाहिजे. कोल्हापुरच्या सिद्धार्थनगर मधून आयु. देवदास बानकर संपादक दैनिक मुक्तनायक यांनी 2015 पासून दहा वर्षापूर्वी सुरवात केली होती. गेल्या वर्षी तो घराघरात बुद्ध उत्सव 18 जिल्ह्यात साजरा केला गेला. आता त्याचा जसजसा प्रचार व प्रसार होईल तसतसे धम्म उपासक-उपासिका तो घरा घरात उत्सव साजरा करतील. यावर्षी 28 ऑगस्ट ते 3 सप्टेंबर 2025 असा सात दिवस हा बुद्ध उत्सव घराघरात साजरा केल्या जाणार आहे असे धम्म प्रचारक सागर रामभाऊ तायडे यांनी सांगितले. भांडुप विभागातील धम्म उपासिका महिला संघाच्या वतीने घरात बुद्ध उत्सव का साजरा करावा? ही जनजागृती अभियान सागर तायडे धम्म प्रचारक अभ्यासक यांच्या मार्गदर्शनाखाली राबवित आहेत. त्यात तुळजाबाई इंगळे, चंद्रकला तायडे, सुनीता तायडे, कोकिळ बांगर, ज्योती थाटे, सुनीता गौतम तायडे, वंदना हिवराळे, विजया वानखडे, या घरोघरी महिलांना एकत्र करून धम्मातील संघाचे महत्व सांगण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. गेल्या वर्षी माता रमाबाई आंबेडकर नगर मध्ये आयु. सुनिल सोनताटे बौद्धाचार्य यांच्या नेतृत्वाखाली चाळीस पंचेचाळीस घरात आणि भीमनगर आंबेडकर नगरातील काही घरात बुद्ध उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला होता. यावर्षी त्यात मोठ्या संख्येने भर पडणार आहे. त्या दृष्टिने जनजागृती सागर तायडे धम्म प्रचारक अभ्यासक, सुनिल सोनताटे बौद्धाचार्य भांडुप विभागातील धम्म उपासिका महिला संघाच्या वतीने केला जात आहे. ■ ■

सुनिल सोनताटे बौद्धाचार्य
मो. 9987819615

# ऐतिहासिक धम्म महासंगिती व सम्राटांचे सानिध्यवर्धन

**1. प्रथम बौद्ध धम्म महासंगिती (पंचशतिका) :** ई.पू. 483, मगध सम्राट अजातशत्रुच्या सानिध्यवर्धनात तथागत बुद्ध महापरिनिर्वाणाच्या 100 दिवसानंतर घडली. प्रमुख मार्गदर्शक महास्थविर महाकाश्यप, स्थविर भदंत आनंद व विनयधर भंते उपाली होते. स्थान राजगृह जवळ वैभार पर्वताच्या उत्तर दिशी सप्तपर्णी लेणी (गुफा) मुख्य ग्रंथ रचना 1) **सुत्तपिटक :** स्थविर आनंदला मुखाग्र 84 हजार सुत्ताची तालपत्रावर रचना केली गेली. 2) विनयपिटक : विनयधर उपाली द्वारा रचित 3) समानतापासादिका 4) महावंश 5) महापरिनिब्बान सुत्त. हि संगिती आरंभ होण्यापूर्वी 6 आठवडे गुफा रंगरोहण व पाटलीपुत्रचे 18 विहार आणि 4 स्तूप सुसज्जित केले गेले होते. संदर्भ- 2500 इयर्स ऑफ बुद्धिजम. पृ. 31, ले. पी.वी. बापट. कुल कालक्रम- 1 वर्ष 4 माह. कुल 500 विज्ञ अर्हत व सहस्त्र पारंगत बौद्ध भिक्षु समाविष्ट होते, ज्यांनी दीपवंश व महावंशाचे 11 खंदक निकाय व कुलवग्ग जसे मूळ ग्रंथाची रचना केली गेली. संदर्भ- शाक्यवंशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृ. 100, ले. गोपीचंद कांबळे. हि महत्वपूर्ण बीजारोही पंचशतिका बौद्ध धम्म महासंगिती विश्व प्रसिद्ध आहे.

**2. द्वितीय बौद्ध धम्म महासंगिती (सप्तशतिका) :** ई.पू. 383, बुद्ध महापरिनिर्वाणानंतर 100 वर्षानी स्थान वैशालीच्या बल्लुकाराम विहार इथे भदंत रैवतच्या अध्यक्षतेखाली आरंभ झाली होती. यात काही वज्जी भिक्षु संघावर आरोप होता कि ते 10 शीलाचे उलंघन करतात. हा वाद भदंत यश (काकन्ड पुत्त) कडे देण्यात आला. यश नि भिक्षु संघात फूट पडू नये या उद्देश्यानी निर्णय दिला कि हे नियम बाह्य आहेत. परंतु यश वर प्रतिसारणीयकम्मचा आरोप केला गेला आणि उपक्कपाणी कम्माची शिक्षा करण्यात आली आणि यशला भिक्षु संघातून बहिष्कृत करण्यात आले.

यश वैशालीवरून कोसांबीला आला. त्याच्या सोबत सहयोगी संभूतसनवासी व सब्बकामी आणि 88 अर्हत अवंती क्षेत्रातून व 68 अर्हत पश्चिम (महाराष्ट्र) आणि 92 दक्षिणचे असे एकूण 700 अर्हत यश कडे आले. त्यांनी भंते अजीतकडून अध्यक्ष चुनावित करण्याचा अधिकार दिला. छन्नक विधीद्वारे गुप्त मतदान करून थेर सब्बकामीला अध्यक्ष निर्वाचित केले. हि कार्यवाही भदंत बुद्धघोषच्या नियंत्रणा अंतर्गत झाली. या महासंगितीला सम्राट काला अशोकचे सानिध्यवर्धन प्राप्त होते. हि संगिती अहोगंगा टेकडीवर संपन्न झाली होती. यात समानतापासादिका अनुसार आचाराला श्रेष्ठ मानून यात दीपवंश, महावंश पुन्हा रचल्या गेले. पिटक, निकाय, अंग, धम्मस्कंद व धम्म विनय सारखे ग्रंथ चर्चा उपरांत सर्व सहमती अनुसार रचल्या गेले. कुल कालक्रम - 8 महिने. हि संगिती सप्तशतिका थेरवादी संघिक नावाने प्रसिद्ध आहे. भदंत रैवतचे कठोर नियम मान्य करणारी महासंघिक संगिती म्हटल्या गेली. संदर्भ- 2500 इयर्स ऑफ बुद्धिजम. पृ. 32, ले. पी.वी. बापट.

**3. तृतीय बौद्ध धम्म महासंगिती (शिलारोही) :** ई.पू. 247-246, बुद्ध महापरिनिर्वाणाच्या 236 वर्षानंतर, स्थान पाटलीपुत्र, अशोकाराम विहार. सानिध्यवर्धन- सम्राट अशोक राज्यरोहण वर्ष 17वा. अध्यक्ष- महास्थविर पिंगलतिस्सदेव, मोगलीपुत्ततिस्स, राधागुप्त (से.प.). कालक्रम- 9 महिन्या पर्यंत. 1000 महास्थविर 18 संप्रदायाचे प्रमुख बुद्धिजीवी. उद्देश्य- धम्मचक्र गतिमान करणे, स्थविरवादी व थेरवादी विभज्ज भिक्षु संघाला एकीकृत करणे. सहस्त्र बुद्धिजीवी ज्ञानीजन, महास्थविर, महाथेर, थेर, भदंत, भिक्षु, शास्त्राकार, साहित्यकार व रचनाकार समाहित होते. हे सिंध, पंजाब, गांधार, कंबोज (अफगान), नेपाल, तिब्बत, हिमांत, पूर्वी भारत, दक्षिण भारत, पश्चिम भारत व उत्तर भारतातील होते. थेर सेग्गवाला 'अर्हत' पदानी सम्मानित केले होते. याच संगितीत सम्राट अशोकाला 'दायदा' सम्मान प्राप्त झाला होता. कारण राजकुमार महेंद्र व पुत्री संघमित्रा धम्म प्रचार हेतू आजीवन समर्पित झाले होते. या संगितीत अभिधम्मपिटक रचल्या गेले. पूर्वीचे सुत्तपिटक व विनयपिटक पुनर्लिखित करून त्रिपिटक निर्मित झाले. तसेच कथावत्थु प्रकरण व धम्मपद लिपिबद्ध केले गेले. सुत्तपिटकाचे 5 भाग करण्यात आले- 1) दिघनिकाय 2) मज्झिमनिकाय 3) खुद्दकनिकाय 4) संयुक्तनिकाय 5) अंगुत्तरनिकाय.

याच संगितीत चहु दिशी गरजते ललाटधारी सिंह धम्मगर्जना संकेत शिल्पांकन निर्मित झाले. त्याला अशोकस्तंभ म्हटल्या गेले. याच बरोबर 24 आरे चे अशोकचक्र शिल्पांकन स्वीकृत झाले. याच बरोबर सत्यमेव जयते, धम्मचक्र प्रवर्तनाय शिल्पांकन करण्यात आले. पुढे पाषाण शिल्पावर धम्मसंदेश शिलालेख उत्कीर्ण करण्याचे ठरविण्यात आले. म्हणूनच या संगितीला शिलारोही संगिती म्हटल्या गेले. याच संगितीत 1) महास्थ. मज्झनिकांत ला गांधार, कंबोज, तक्षशिला, कश्मीर व ईरान सीमा प्रांत धम्म प्रचाराहेतु सोपवला 2) स्थ. महारक्खितला लद्दाख, बर्मा व हिमांत प्रांत 3) उत्तर स्थ. थेरसेन (सम्राट चा धाकटा बंधु तिस्स मित अशोक) ला स्वर्णभूमी (आंध्रप्रदेश) 4) उत्तर स्थ. महारक्खित (महादेव) ला माहिष्म मंडल मध्यप्रांत व सतपुडा 5) उत्तर स्थ. शांतरक्खित (शंकर) ला कर्नाटक, वोड 6) स्थ. काश्यपला उत्तरांचल, हिमांत पर्वतीय प्रदेश 7) महाथेर रक्षितला उत्तरी किनारा, जंगली प्रदेश 8) महाथेर महा धम्मरक्षितला नागभूमी (विदर्भ), अपरांत, महाराष्ट्र प्रदेश 9) भदंत यौनकला कोंकण, सह्याद्री खोरे, गोमंतक प्रदेश 10) महामहेंद्र - संघमित्राला सिंहलदेश व (म्यानमार, म्रम्मा) देशात धम्मप्रचार प्रसारा करीता पाठविण्यात आले होते. याच संगितीत निःशुल्क चिकित्सालय, प्राणी चिकित्सालय व स्वास्थ्यवर्धक उपाय, राजमार्ग, वृक्षारोहण व दुरन्तक आणि पाणी पिण्याच्या बावुलिया (विहिरी) निर्मित करणे निर्धारित झाले होते.

**4. चतुर्थ बौद्ध धम्म महासंगिती (गुफारोही) :** ई.पू. 86 (BE 457) सिंहल (सिलोन) नरेश अभयवट्टगामिनीने आलोकनाथ गुफा (मातुलग्राम) च्या आलोक विहारच्या समीप प्रमुख मार्गदर्शक महाथेर महारक्षित सहित 500 पारंगत अर्हत व सहस्त्र भिक्षु, भिक्षुणी मिळून 9 महिन्यापर्यंत आयोजित केली होती. पाली, मागधी भाषाला सिंहलीमधे परिवर्तित करून पूर्वीचे सर्व ग्रंथ सिंहली भाषात लिपिबद्ध केले होते. याच काळखंडात सतकर्णी हालुकचा विवाह अभयवट्टगामिनी पुत्री मलयवती शी झाला होता. या संगितीला सतकर्णी हालुकचे सानिध्य संवर्धन प्राप्त होते. उत्तरापथात बौद्ध धम्मावर आलेल्या संकटातून धम्म सुरक्षित ठेवण्या करीता जंगली मार्गातील टेकड्या उत्खनित करून लेण्या (गुफा) निर्मित करून धम्मसूत्र उत्कीर्ण करणे हा संकल्प ठरविण्यात आला होता. म्हणूनच या संगिती ला गुफारोही संगिती म्हणतात. श्रीलंका आणि दक्षिण भारतात (महाराष्ट्र) सर्वात अधिक लेण्यांची संख्या प्रदर्शित होत आहे, याचे मुख्य कारण हेच आहे.

ई.पू. 247-207 च्या दरम्यान महामहेंद्र (अनुबुद्ध) व संघमित्रा नि अनेक बौद्ध ग्रंथ 500 भिक्षुणी सोबत बोधिवृक्ष शाखा श्रीलंकेत घेऊन गेले होते. आज पर्यंत हे बोधिवृक्ष अनुराधापुर बुद्धविहार प्रांगणात पूजनीय आहे.

**5. पंचम बौद्ध धम्म संगिती :** ई.पू. 27 (BE 516) चे आयोजन सिलोन नरेश महानामाच्या कालकीर्तीत कोलंबो इथे संपन्न झाली होती. यात इडामालगोडा वसनायक निलामे, इक्कदेवे सिरी सोमंगल ने अध्यक्षीय भूमिका सादर केली होती. यात सारे पाली-प्राकृत व मागधी भाषाचे ग्रंथ अनेक प्रकारे परीक्षण करून सिंहली भाषेत रचल्या गेले, जसे महावंश, दीपवंश, त्रिपिटक, समानता पासादिका, कुल्लवग्ग, धम्मपद, जातक कथा इत्यादी. या कार्यात भदंत बुद्धघोष व त्यांच्या पारंगत भिक्षुसंघांनी सहयोग केला होता.

**6. षष्टम् बौद्ध धम्म संगिती :** ई.स. 87 (BE 630) ला सम्राट कनिष्कच्या सानिध्य संवर्धनात कश्मीर (पुष्पपूर) कुंदनवन इथे आयोजित झाली होती. अध्यक्ष पार्श्व आणि प्रमुख महास्थविर अश्वघोष, वसुबंधू, वसुमित्र व नागार्जुन होते. या संगितीत दक्षिण भारतातील थेरवादी भिक्षु नव्हते. तिथे 500 महासांघिक बौद्ध भिक्षु होते. या संगितीत संस्कृत भाषा श्लोक रचना करून अभिधम्मविभाषा, विनयविभाषा, सुत्तविभाषा रचल्या गेले. यात स्थविरवादी, सर्वास्तिवादी भिक्षु समाहित होते. यात सिंध, काबुल, गांधार, उत्तर-पश्चिम भारत व मध्य देशातून महासंघिक भिक्षु शामिल होते. सम्राट कनिष्क स्वतः संगितीत उपस्थित राहून निरीक्षण करीत असत. त्यांचा प्रण होता कि सम्राट अशोका प्रमाणे विभिन्न प्रांतात देश-देशांतर दूर-सुदूर जंगली प्रांतात बौद्ध भिक्षूंना धम्म प्रचार-प्रसाराकरिता पाठवून संपूर्ण विश्व बुद्धमय करावा. या करिता उत्तर भारताचे मुख्य केंद्र जालंधर व पश्चिम नैरुत्य भारताचे केंद्र कश्मीर होते. नागार्जुनद्वारा राजा तृस्तकच्या नियमाप्रमाणे अंगीकृत केले गेले नियम वापरून तो दक्षिणेकडे थेर, महाथेर व अर्हत यांच्याकडे तृस्तक सुत्त घेऊन आला आणि सम्राट गौतमीपुत्र सतकर्णी-23 चा धम्मसारथी बनला. ह्वेनसॉगच्या अनुसार या संगितीत ताम्रपत्रावर श्लोक उत्कीर्ण करून दगडाच्या संदूकात सुरक्षित केले होते. नागार्जुनानी राजतरंगिणीत राजा तृस्तकचे वर्णन लिहले आहे. वसुबंधू नि संस्कृत भाषेत अभिधम्मकोष लिहले होते.

**7. सप्तम् बौद्ध धम्म संगिती :** ई.स. 1044 (BE 1587), सिंहल नरेश पराक्रमबाहूच्या राजमहलात त्रिपिटकाचे पुनरावलोकन केले गेले, जे मूल ग्रंथ महाथेर महाकाश्यप द्वारे प्रथम बौद्ध धम्म संगितीत लिहल्या गेले होते, जे पाली-प्राकृत व मागधी भाषेत होते. त्या सर्वांचे सिंहली भाषेत रूपांतरित केले गेले. या संगितीत सहस्त्रावधि थेर, महाथेर, स्थविर, महास्थविर सहभागी झाले होते. या संगितीला सानिध्य संवर्धन आणि अध्यक्षता निर्वहन स्वयं सम्राट पराक्रमबाहूनि केले होते. जवळपास एक वर्षापर्यंत विचारपूर्वक व सविस्तर पुनरावलोकन करून ग्रंथ रचल्या गेले.

**8. अष्टम् बौद्ध धम्म संगिती :** ई.स. 1483 (BE 2026) स्याम (थायलैंड) सम्राट श्री धम्मचक्रवर्ती तिलकराजाधिराजचे सानिध्य वर्धन प्राप्त होते. उत्तर थायलंडची तत्कालीन राजधानी 'चिएंगमाई' इथे सहस्त्र विद्वान पारंगत भिक्षु सहित नवीन भिक्षूंना प्रशिक्षित केल्या गेले. धम्म प्रचार-प्रसारात शुद्ध रूप साधणे हा उद्देश्य होता. हा उपक्रम जवळपास एक वर्ष भाषा रूपांतरित करून या धम्म संगितीचे समापन झाले.



**9. नवम् बौद्ध धम्म महासंगिती :** ई.स. 1788 (BE 2331) नेइग्रोपौरिंग राज्याच्या आक्रमक युद्धानंतर थायलंडची तत्कालीन राजधानी आयुथाईच्या अनेक ग्रंथालयात पुस्तकालय विद्यालय व राजभवनाची जाळपोळ करून ध्वस्त केले होते. यात त्रिपिटकासारखे अनेक ग्रंथ जळून राख झाली होती. लोकात बंधुभाव, करुणा, मैत्री व इमानदारीत कमी झाली होती. अश्या काळखंडात थाई नरेश राजाराम (प्रथम) व त्यांचा भाऊ थायलंडची सुख-शांती व उन्नती पुन्हा प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात जुटले होते. या करीता त्यांनी भिक्षुसंघाकडे धाव घेतली. विद्वान पारंगत भिक्षूशी संपर्क करून त्यात 218 वयस्क (वृद्ध) व 32 स्कॉलर (पदवीधर) यांचा लोकांमधे नियमित परामर्श सभा ठेऊन एक वर्षा पर्यंत नवीन त्रिपिटक आणि इतर ग्रंथ निर्मित केले. या नंतर पूर्ण उत्साहात निर्बाध गतीने संपूर्ण थायलंड देशात बुद्ध धम्म प्रचार-प्रसार आरंभ झाला. थायलंडची नवीन राजकीय परिपाटी (मॉनेस्ट्री) व पागोडे निर्मित झाले. त्यात पुन्हा बौद्ध धम्म ग्रंथांना सुरक्षित करण्यात आले. सर्वधर्म संप्रदाय भावना अंतर्गत अन्य धार्मिक लोकांना सुद्धा नवीन शासकीय परिपाटीत सहभागी करण्यात आले. त्यांचे आराधना स्थल, पूजाघर, मंदिर हि निर्मित होऊ लागले.

ई.स. 1789 (BE 2332) अंतर्गत थायलंडचे महाधम्मगुरु थाई पलिराज सोमदेज फ्रा वनारत्त (भदंत वानरत्न) द्वारे थाई नरेश राम (प्र.) द्वारे संपादित संगितीचे संपूर्ण रेकॉर्ड भारतात झालेल्या पूर्वीच्या महासंगितीच्या रेकॉर्डशी संतुलन परीक्षण करण्यात आले आणि सिंहलच्या चतुर्थ, पंचम, षष्टम् संगितीच्या रेकॉर्डशी थायलंडला झालेली अष्टम् व नवम् संगितीची ऐतिहासिक माहितीशी संतुलन परीक्षण केल्या गेले. त्याच प्रकारे महावंश आणि दीपवंश व इतर सिंहली संस्कृतीचा प्रभाव परीक्षण करून सत्यताची जाच-पडताल करून एक वर्षापर्यंत अवलोकनानंतर मान्यता प्रदान केली गेली.

डॉ. एन. वी. ढोके,
मो. 9423677725

**10. दशम् बौद्ध धम्म संगिती :** ई.स. 1865 (BE 2408) अंतर्गत सिंहल (सिलोन) च्या रतनपूरला आयोजित झाली होती. यात अध्यक्षस्थानी हिक्कादुवे श्रीसुमंगलच्या मार्गदर्शनानुसार 5 महिन्या पर्यंत या संगितीत सहस्त्र अर्हत समाविष्ट होते. या संगितीला इदामालगोडा वासनायकनिलामे नरेशाचे सानिध्यवर्धन प्राप्त होते. सर्व पाली-प्राकृत व मागधी भाषेतून पुनरावृत्त झालेल्या सिंहली ग्रंथाचे अवलोकन व सत्यता परीक्षण करण्यात आले होते.

**11. अकरावी बौद्ध धम्म संगिती :** ई.स. 1871 (BE 2414) अंतर्गत म्यानमार (वर्मा/म्रम्मा) देशाची राजधानी मांडले ला सम्राट 'मिंडॉनमिं' (मीनू) आणि 2400 पारंगत थेर, महाथेर, स्थविर, महास्थविर, प्रशिक्षित बौद्ध भिक्षु सहभागी झाले होते. या संगितीची अध्यक्षता सुमंगलस्वामींनी केली होती. धम्मगुरु जगाराभि वायास नरीनंदाभि ध्वजा यांच्या मार्गदर्शना अंतर्गत त्रिपिटकाला पक्या संगमरमरी प्लेटांवर उत्कीर्ण करण्यात आले होते. या करिता चिन्हित 729 मार्बल प्लेटचा उपयोग करण्यात आला होता. हे कार्य सुचारू व सुरक्षित राजमहलात 6 महिन्यापर्यंत संपन्न झाले होते. यात त्रिपिटकाऐवजी अन्य उपलब्ध ग्रंथाचे अंश सुद्धा संग्रहित करण्यात आले होते. हे कार्य पारंगत अनुभवी विद्वान महाथेरांनी खूब परिश्रम करून संपादित केले होते.

**12. बारहवी बौद्ध धम्म महासंगिती :** ई.स. 1954 (BE 2497) मई अंतर्गत विश्व भातृत्व संमेलन अथवा विश्व एकीकृत बौद्ध धम्म महासंगितीचे आयोजन म्यानमार (वर्मा/म्रम्मा) इथे संपन्न झाले होते. या महासंगितीत एकीकृत बौद्ध धम्म ग्रंथ रचना आणि वैचारिक एकता निर्माण करणे हा उद्देश्य होता. या सांगितीचे आमंत्रण भारत, सिलोन, नेपाल, थायलॅंड, कंबोडिया, लाओस व पाकिस्तान वरून स्कॉलर (डेलिगेट्स) व विद्वान स्थविर, महास्थविर, थेर, महाथेर आमंत्रित होते. अध्यक्ष्यता सम्माननीय अभिदाज महाराष्ट्र व भदंत रैवत होते. यात म्यानमारचे 500 भिक्षु, अभ्यासु धम्म शिक्षाची कवायद (प्रॅक्टिस) करणारे होते. त्यांच्या वर लेखन परिक्षणाची जिम्मेदारी होती. त्रिपिटक अनुरूप अथवा विपरीत एक प्रकारची हि जाच समिति होती. त्याच प्रकारे अन्य मूल ग्रंथा अनुरूप आहे अथवा नाही, अश्या अनेक भिक्षुंच्या समिती या होत्या. हि संगिती अति महत्वपूर्ण जगप्रसिद्ध होती, कारण तथागत बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचे हे 2500वे वर्ष होते. विश्वशांती, भाईचारा व मैत्री हा मुख्य उद्देश्य होता. या संगितीचे उद्घाटन राजधानी रंगून इथे 3 दिवसा पर्यंत सुरु होते. अनेक प्रकारचे कक्ष (काउंटर) होते. संपूर्ण जगातील राष्ट्राध्यक्ष, प्रधानमंत्री, राष्ट्रप्रमुख व सम्राटाचे संदेशपत्र येत होते. त्यांचा संदेश हिंदी व अंग्रेजी भाषेत रूपांतरित करून प्रसारित केल्या जात होता. भारतातून राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद व प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांचा संदेश प्रसारित केल्या गेला. हे छत्र संगायन उद्घाटन वैशाख पूर्णिमा (बुद्ध पूर्णिमा) दिवशी रंगून इथे झाला होता. यात राजगृह, वैशाली आणि बुद्धगया इथल्या माती (मिट्टी)ची पूजा करून संगिती आरंभ झाली होती. टेक्स्ट लेख व स्क्रिप्ट्सचे हिंदी आणि अंग्रेजी भाषेत रूपांतरण केले जात होते. हि जागतिक पातळीची संगिती 2 वर्षांनी मई 1956 पर्यंत संपन्न झाली होती. या संगितीचे भारताचे संपर्क प्रतिनिधी अर्हत आर. एन. सोनी होते. भारताचे उभरते नेता डॉ. बी. आर. आंबेडकर स्कॉलर म्हणून आमंत्रित होते. डॉ. आर. एल. सोनी यांच्या आग्रहावरून ते म्यानमार इथे या महासंगितीच्या आयोजनात शामिल झाले होते. त्यांनी अर्हत डॉ. सोनीच्या प्रबोधनात हे वाक्य ऐकले कि धम्म लुप्त झाल्यावर 2500 वर्षानंतर मैत्रेय बुद्ध या धरतीवर उपस्थित होतील. हि पूर्वीच्या अर्हतांची भविष्यवाणी आहे. एका वर्मी बुद्धिस्ट स्कॉलरच्या वक्तव्यात डॉ. आंबेडकरांनी ऐकले कि भारतात उत्पन्न झालेला बुद्ध धम्म विलोपीत झालेला आहे. हि आमची आज शोकांतिका आहे. हे ऐकून डॉ. आंबेडकर आपले विचार व्यक्त करण्याकरिता सहमत झाले आणि आपल्या संबोधनात ते म्हणाले, तथागत बुद्धाच्या महापरिनिर्वाणापासून 2500 वर्षानंतर भारतात बुद्ध धम्माचा बीजांकूर झालेला आहे. भारताची मुद्रा अशोकस्तंभ धम्मगर्जनाचा संकेत आहे. भारताच्या ध्वजावर अशोकचक्र (धम्मचक्र) उत्कीर्ण आहे. भारताचे सर्वोच्च (राष्ट्रपती) सिंहासनच्या मागे 'धम्मचक्र प्रवर्तनाय' व पुढे 'सत्यमेव जयते' उत्कीर्ण आहे. राष्ट्रपती भवनाच्या विशाल कक्ष (हॉल) मधे बुद्धाची आदमकद अष्ठधातु प्रतिमा धम्मचक्र प्रवर्तनाय मुद्राची स्थापित आहे आणि याच 2500 व्या वर्षी भारताच्या बुद्ध धम्मवृक्षाला पाने (पत्ते) व बहार (मोहर) येणार आहे. हे आइकून सभा मंडपात जोरशोरात टाळ्यांचा घणघणाट नांदू लागला. कार्यक्रम संपल्यावर डॉ. आंबेडकर अर्हत डॉ. आर. एल. सोनीच्या कार्यालयात जाऊन भेटले. म्हणाले, याच वर्षी 2500 वर्षानंतर भारतात धम्मचक्र प्रवर्तन होणार आहे आणि ते माझे आधीपासूनच ठरल आहे. भविष्यात होणारा मैत्रेय बुद्ध तिथे येणार आहे कि काय? डॉ. सोनी समजू शकले किंवा नाही, परंतु 14 ऑक्टोबर 1956 विजयादशमीच्या दिवशी नागपूरच्या दीक्षाभूमी वर धम्मचक्र प्रवर्तन घडून आले. ■ ■




# लुबिंनी बुद्ध विहार

धनगवडी, बाबा नगर, खरबी नागपूर, या विहाराची स्थापना सन 2014 मध्ये करण्यात आली. दररोज सकाळी-सायंकाळी वंदना होत असते. त्याचप्रमाणे थोर पुरुषांच्या जयंती व स्मृतिदिन साजरे केले जातात. या कार्यात चित्रा मेश्राम, सरिता पाटील, गोकुळा हिवराळे, शालिनी बन्सोड, रत्नमाला रामटेके, मंजुषा मकेश्वर, विशाल रामटेके, भारत धनविजय, रमेश मेश्राम, येनलाल रामटेके, ललित बनसोड यांचे नेहमी सहकार्य असते.

संवाद मित्र,हरिदास बेलेकर
मो.9372421695

# संजय गांधी निराधार योजनेच्या वृद्ध लाभार्थ्यांचे बेहाल

## मुख्यमंत्री देवेन्द्र फडणविस यांनी तातडीने लक्ष द्यावे - रिपाई जनमोर्चाचे आवाहन

**नागपूर :** संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यांसारख्या गरीब, निराधार व वृद्ध हितग्राहींसाठीच्या महत्वाच्या योजनांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून अनुदान थांबल्याने लाभार्थ्यांचे हाल झाले आहेत. फेब्रुवारी 2025 पासून खात्यात पैसे जमा न झाल्याने अनेक वृद्ध, विधवा महिला व निराधार व्यक्ती जिल्हा कार्यालयात हेलपाटे घालत आहेत. यासंदर्भात रिपाई जनमोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सुरेशचंद्र घाटे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, असे आवाहन केले आहे. ॲड. घाटे यांनी सांगितले की, सुरुवातीला 200-250 रुपये असलेले मासिक अनुदान सध्या 1500 रुपयांपर्यंत वाढले असून त्याचा मोठा आधार निराधारांना मिळतो. मात्र, डिसेंबर 2024 नंतर कागदपत्रे सादर करूनही फेब्रुवारी 2025 पासून रकमेचा तुटवडा निर्माण झाला आहे. 28 जुलै रोजी निवासी जिल्हाधिकारी अनुप खाडे यांनी एका वर्तमानपत्रात 16 ऑगस्टपर्यंत कागदपत्रे पुन्हा जमा करण्याची अस्पष्ट सूचना दिल्यामुळे गोंधळ




निर्माण झाल्याचेही त्यांनी नमूद केले. 'ज्यांनी फेब्रुवारी 2025 मध्येच मनपा व तहसील कार्यालयात कागदपत्रे सादर केली आहेत, त्यांना पुन्हा कागदपत्रे मागणे अन्यायकारक आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने आदेश देऊन सर्व पात्र लाभार्थ्यांना अनुदानाची थकबाकी तत्काळ द्यावी,' अशी मागणी ॲड. घाटे यांनी केली. नागपूर जिल्ह्यात सत्ताधारी व विरोधी पक्षाचे अनेक आमदार असूनही वृद्ध निराधारांचे प्रश्न न सुटल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. 15 सप्टेंबरपर्यंत प्रश्न मार्गी न लागल्यास धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा देखील त्यांनी दिला.



# स्नेहबंध ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे सत्कार सोहळा व स्नेहमिलन

**नागपूर :** स्नेहबंध ज्येष्ठ नागरिक मंडळ अध्यापक ले-आऊट, त्रिमूर्तीनगर नागपूरच्या वतीने अध्यक्षा माधुरी पाखमोडे आणि समस्त कार्यकारिणीने सत्कारमूर्ती ज्येष्ठ समाजसेवक मधुकररावजी काकडे यांचा सपत्नीक सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा मराठा सेवा संघाच्या सभागृहात साजरा केला. त्याप्रसंगी अध्यक्षपदी ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव डॉ. राजू मिश्रा, तसेच मराठा सेवा संघाचे सचिव सोमनाथ लडके उपस्थित होते. प्रमुख अतिथीमध्ये साथ फाऊंडेशनचे संस्थापक प्रयाग डोंगरे, वृंदा ठाकरे आणि डॉ. लीना निकम उपस्थित होत्या. नातेवाईकांपेक्षा ज्येष्ठ नागरिकच एकमेकांच्या मदतीला धावून येऊ शकतात असे मनोगत डॉ. मिश्रा यांनी व्यक्त केले. मंदाकिनी काकडे यांनीही याप्रसंगी कविता वाचन करून काकडे यांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाच्या उपाध्यक्षा शोभा बावनकर व वामनराव बावनकर यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन विजय पुंडकर तर प्रास्ताविक माधुरी पाखमोडे यांनी केले. नागपूर शहरातील विविध ज्येष्ठ नागरिक मान्यवरांचा त्याप्रसंगी सत्कार करण्यांत आला. सचिव अनघा वेखंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. डॉ. एल. आर. पाखमोडे, विजयलक्ष्मी वैष्णव व शेखर सोनी यांनीही प्रयत्न केले.

## महत्वाचे

### विचार परिषद समिती जिल्हाध्यक्षपदी विलास शेवाळे यांची निवड



**नागपूर :** पुरोगामी प्रबोधन चळवळ अंतर्गत, विचार परिषद समिती विदर्भ अध्यक्ष प्रा. विनय मिरासे यांच्या नेतृत्वाखाली, जिल्हाध्यक्षपदी विलास शेवाळे, आशिर्वाद फाउंडेशनचे अध्यक्ष यांची निवड करण्यात आली आहे. नियुक्तीपत्र देताना पुरोगामी प्रबोधन चळवळ नागपूर जिल्हाध्यक्ष रंगराज गोसावी तसेच पुरोगामी प्रबोधन चळवळीतील विदर्भ अध्यक्ष रवी हाडे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा स्वागत आणि सत्कार करण्यात आला. त्यावेळी नियुक्त पत्र देताना पुरोगामी प्रबोधन चळवळीतील विदर्भ अध्यक्ष रवी हाडे, भारत निर्माण फोरमचे, गौतम ऋषी यांनी स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीस अभिनंदन देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### बानाई पुरस्कृत म. ज्योतिबा फुले व्यवसाय मार्गदर्शन केंद्र आज मोफत मार्गदर्शन सत्र



**नागपूर :** बा.ना.ई. पुरस्कृत महात्मा ज्योतिबा फुले व्यवसाय मार्गदर्शन केंद्र तर्फे 2 सप्टेंबर 2025 रोजी सायं. 5 ते 7 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, उरूवेला कॉलनी, वर्धा रोड येथे मोफत मार्गदर्शन सत्र होणार आहे. केंद्र-राज्य शासन व स्थानिक प्रशासनाच्या विविध लोन, कर्ज व आर्थिक सहाय्य योजनांबाबत माहिती, तसेच त्वरित उत्पन्नाचे स्रोत उभारणीसंबंधी मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यक्रमासाठी राहुल गेडामकर, सुमेद फुलझेले व डॉ. पूजा नाखले मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### दीक्षाभूमीत निविदा शिवाय कंत्राट देता येणार नाही : डॉ. राजेंद्र गवई



**नागपूर :** मागील दोन वर्षापासून भंते सुराई ससाई अध्यक्ष परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर केवळ त्याच्याच सहीने धनादेश वटवीत आहे. याबाबत स्मारक समितीने धर्मदाय आयुक्त नागपूर यांना तक्रार दिली आहे. धनादेश वरती किमान दोन ते तीन सचिव सभासदांच्या सह्या असणे आवश्यक आहे. त्याच बरोबर यावर्षी दीक्षाभूमीचा होणारा धम्मचक्र प्रवर्तक दिन आणि त्या सोहळ्याकरिता देण्यात येणाऱ्या विविध कंत्राट जसे मंच सुशोभीकरण, पेंडॉल, बॅरिकेट, विद्युत रोशनाई, लाऊड स्पीकर (ध्वनी व्यवस्था) इत्यादी कामे निविदा शिवाय देता येणार नाही. असे दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे कळविले आहे.

### बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रूप नागपूरच्यावतीने वर - वधू परिचय मेळावा 7 सप्टेंबरला



**नागपूर :** सहयोग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था नागपूरद्वारा संचालित बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रूप नागपूरच्यावतीने 7 सप्टेंबर रोजी रविवारी विदर्भ साहित्य संमेलन अर्पण हॉल, पहिला माळा, सिताबर्डी झाशी राणी चौक, नागपूर येथे वधू - वर परिचय मेळाव्याचे आयोजन दुपारी 2 ते 5 या वेळेत करण्यात आले असून या परिचय मेळाव्याचा लाभ सर्व समाज बांधवांनी व नागरिकांनी घेण्यात यावा. असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रमोद सोमकुवर यांनी केली आहे. माहितीसाठी प्रमोद सोमकुवर यांच्या मो. 93736-17114 क्रमांकावरील संपर्क साधू शकता.

# डॉ. आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस अँड पीसचा पदग्रहण सोहळा

**नागपूर :** 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर जस्टीस अँड पीस' चा पदग्रहण सोहळा 31 ऑगस्ट 2025 रोजी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृहात नुकताच पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आयआयटी कानपूरचे अजय वासनिक तर प्रमुख अतिथी म्हणून एसीजेपी महाराष्ट्र अध्यक्ष के. जे. चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष देवेंद्र घरडे, डॉ. आंबेडकर मिशनचे उपाध्यक्ष ॲड. बी. जे. गजभिये व बी. टी. वाहणे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नागपूर शहर पदाधिकाऱ्यांचे नियुक्ती पत्र देऊन स्वागत व पदग्रहण सोहळा पार पडला.



नागपूर शहर कार्यकारिणी पुढीलप्रमाणे - अध्यक्ष भोला सर्वर, कार्याध्यक्ष डी. के. रामटेके, महासचिव रितेश बनसोड, उपाध्यक्ष तुषार वालदे, किरण फुलझेले, जनकीशरण साहू, सचिव प्रा. नंदा भगत, कार्यालयीन सचिव संजय गजभिये, कोषाध्यक्ष ॲड. वंदना शहारे, सहसचिव अमर भांगे, मधुकर रामटेके (गुरुजी), प्रमुख मार्गदर्शक ॲड. बी. जी. गजभिये, बी. टी. वाहने, नरेश महाजन, प्रवक्ता प्रभाकर पानतावणे, महिला आघाडी प्रमुख दीपा फुलेकर, महिला संघटक मंगला नांदगावे, महिला उपप्रमुख गीता चौरे, युवा आघाडी प्रमुख निखिल मेश्राम, सदस्य शुद्धोधन सोनारे, अरविंद तायडे यांची निवड करण्यात आली. निवड व घोषणा प्रदेश कार्याध्यक्ष देवेंद्र घरडे यांनी करून पुढील वाटचालीकरिता कार्यप्रणाली समजावून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. जातीच्या नावावर अनु.जाती/जनजातीवर होणारे अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी ऐ.सी.जे.पी. भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने समाजकार्य करीत आहे ही विशेष बाब असून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थितीवर कार्य करीत असते. कार्यक्रमाचे संचालन ॲड. वंदना शहारे यांनी केले तसेच आभार प्रा. नंदा भगत यांनी मानले.

# मुले ही राष्ट्राची मौल्यवान संपत्ती : डॉ. एन.डी. पाटील

**नागपूर :** 'पालकांनी आपल्या मुलांना केवळ आपल्या दृष्टीनेच नव्हे तर राष्ट्राची मौल्यवान संपत्ती समजून त्यांचा सर्वांगीण विकास घडवावा. मुलांना बौद्धिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम बनवणे ही पालकांची जबाबदारी आहे,' असे प्रतिपादन प्रख्यात नेत्रतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते डॉ. एन.डी. पाटील यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, ऊरुवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर येथे आयोजित दोन दिवसीय पालक कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ही कार्यशाळा संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम व बुद्ध विहार समन्वय समिती यांच्या वतीने 30 व 31 ऑगस्ट रोजी घेण्यात आली. विषय होता, 'मुलांच्या अभ्यासात आई-वडिलांची भूमिका'.



या प्रसंगी अपूर्वा संचेती यांनीही मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कार्यशाळा नेतृत्व करणारे अशोक सरस्वती बौद्ध होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून पालकांनी शिबिरात मिळालेल्या मार्गदर्शनाचा दैनंदिन व्यवहारात उपयोग करण्याचे आवाहन केले. शिबिरात डॉ. बी. एस. गेडाम, डॉ. सूचित बागडे, डॉ. प्रेरणा कांबळे, डॉ. सुनील भगत, अस्मिता बुलकुंडे, डॉ. सरोज आगलावे, डॉ. सरोज डांगे, डॉ. प्रमिला चिंचखेडे, तारा गजभिये, प्रा. घनश्याम धाबर्डे, विजयकांत पाणबुडे, छाया सावरकर, डॉ. संध्या पवार, अरविंद गेडाम, सरदार जगजीत सिंग, अशोक सरस्वती यांच्यासह एकूण 17 विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रास्ताविक, संचालन व आभार प्रदर्शनाची जबाबदारी सतीश गायकवाड, सुषमा पाखरे, नंदा भगत, मृणाली दहीवडे, सुविता लोखंडे, ममता गणवीर, सुचिता बुरबुरे, अंजली भजने, ईश्वर कुरडकर यांनी पार पाडली.

व्यवस्थापनाची जबाबदारी प्रमिला सोनवणे, माया जामगडे, सुरेश बुरबुरे, वर्षा टेंभेकर, महेंद्र कराडे, जितेंद्र राऊत, विश्वनाथ लोखंडे, भुपेश वंजारी यांनी सांभाळली.

# बौद्धांनी शाळा कॉलेजेस कडे लक्ष द्यावे : बी.टी. वाहणे



**नागपूर :** केजी टू पीजीपर्यंत शाळा कॉलेजेस असावेत असे जेष्ठ प्रबुद्ध नागरिक बी. टी. वाहणे यांनी सांगितले तर ईजराइल शेख यांनी सांगितले की, आज संविधानाचे रक्षण करणे सर्वांनाच अतिशय गरजेचे आहे. आपण सर्वांनी मिळून एकत्रितपणे संघटित होऊन कार्य केले तरच संविधानाचे संरक्षण होऊ शकेल असे म्हणाले. उत्तर नागपुरातील बहुजन हिताय संघ हि सामाजिक कार्य करणारी एकमेव सर्वश्रेष्ठ संघटना आहे. या संघाला सर्व बौद्ध लोकांनी सहकार्य करायला पाहिजे. तरच या संघाकडून सामाजिक, धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य उत्तमरितीने पार पाडले जाऊ शकते असे अध्यक्षीय भाषणात अजय वासनिक यांनी सांगितले.

बहुजन हिताय संघाची 434 वी साप्ताहिक सभा डॉ. बाबासाहेब यांची मिशन येथे झाली.

अध्यक्ष इंजि. वासनिक, मोहम्मद इजराईल शेख होते. समापन गाथा देविदास राऊत, राष्ट्रगीत नंदा भगत, संचालन ॲड. हंसराज भांगे, आभार संगिता पानतावणे यांनी मानले. प्रकाश सोनटक्के यांनी सहकार्य केले.

# प्रा. डॉ. श्यामसुन्दर भोगा यांचे निधन



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे भूतपूर्व विभाग प्रमुख

प्रा. डॉ. श्यामसुन्दर भोगा यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्यामूळे दि.31-08-2025 ला सकाळी निधन झाले. डॉ. श्यामसुन्दर भोगा यांचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात झाला. घरची हलाखीची परिस्थिति असताना देखील त्यांनी आपल्े शिक्षण पूर्ण केले. बल्लारपुर येथिल गुरुनानक महाविद्यालयमधून पदवीधर झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षण भौतिक शास्त्रा मधे एम.एससी., एम.फिल., पी.एचडी. नागपूर विद्यापीठातून घेतले.

सुरवातीला काही दिवस हिस्लॉप कॉलेज येथे सेवा दिल्यानंतर नागपूर विद्यापीठामधे प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले आणि तेथुनच मे 2020 मध्ये निवृत झालेत.

ते आजन्म अविवाहित राहुन आयुष्यभर संशोधन व अध्यापन करित रहिले. भौतिक शास्त्र विभागात मटेरियल साइंसची प्रयोगशाळा निर्मितीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या नावावर अनेक 100 च्या वर आंतरराष्ट्रीय शोध निबंध प्रकाशित झालेत. तसेच पेटेंट सुद्धा पंजीकृत केलेत. डॉ. भोगा यांनी एम.फिल, तसेच पी.एचडी च्या अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांचे संशोधन कार्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन प्रसिद्ध झाले. जर्मनी येथिल विश्वस्तरीय ख्यातनाम मैक्स प्लैंक इंस्टिट्यूट मध्ये त्यांची नियुक्ति झाली होती. संशोधना संबंधित त्यांनी अनेक देशांना भेटी दिल्या आणि संशोधन केले. त्यांच्या निधनाने शैक्षणिक तसेच भौतिक विज्ञान क्षेत्रामधे शोककळा पसरली आहे. त्यांच्या परिवारात चार भगिनी व एक भाऊ असुन त्यांचा भाचा विशाल भोगा व संगीता भोगा यांनी डॉ. श्यामसुंदर भोगा यांची शेवटपर्यंत अथक सेवा केली. त्यांच्या निधनाबद्दल डॉ. विलास तभाने, डॉ. ओमप्रकाश चिमणकर, डॉ. स्मिता आचार्य, डॉ. संजय ढोबळे, डॉ. सुभाष कोंडावार, डॉ. सुनिल भगत, डॉ. बोरकर, डॉ. सतीश गोस्वामी आणि इतर पदार्थ विज्ञान विभागाचे शिक्षक यांनी दुःख व्यक्त केले आहे.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण 3 रा दिवस

## ओबीसी आरक्षण अबाधित राहील : गृहराज्यमंत्री पंकज भोयर



**नागपूर :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बेमुदत साखळी उपोषण संविधान चौक, नागपूर येथे 30 ऑगस्टपासून सुरू आहे. आज उपोषणाचा तिसरा दिवस असून या आंदोलनाला राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी भेट देऊन ओबीसी आरक्षण अबाधित राहील, असे आश्वासन दिले. मराठा समाजासाठी मनोज जरांगे यांनी 29 ऑगस्टपासून मुंबईत आंदोलन सुरू केले आहे. त्याला विरोध म्हणून डॉ. बबनराव तायवाडे (राष्ट्रीय अध्यक्ष) व सचिन राजुरकर (महासचिव) यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण सुरू करण्यात आले आहे. 2023 मध्ये शासनाने मराठा समाजाला कोणत्याही परिस्थितीत ओबीसी आरक्षण दिले जाणार नाही, असे लिखित आश्वासन दिले होते. त्याचप्रमाणे पुन्हा लेखी आश्वासन मिळेपर्यंत उपोषण सुरूच राहील, असे डॉ. तायवाडे यांनी स्पष्ट केले. आजच्या उपोषणात श्रीकांत दौलतकार, शाम लेडे, अशोक चिंचे, कविश्वर खडसे, डॉ. सुरेश चिकटे, राजू बोचरे, गुणेश्वर आरिकर, गोपाल झाडे, राजकुमार वाळ्के, डॉ. विनोद गावंडे, सुरेश कुथे, गेमराज गोमासे आदी सहभागी झाले होते. या आंदोलनाला रामदास मसराम (आरमोरी), माजी आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार सेवक वाघाये यांसह तिरळे कुणबी समाज संघटना, अखिल भारतीय सर्ववर्गीय कलार समाज संघटना (भूषण दडवे), विदर्भ माध्यमिक संघ (अनिल गोतमारे) यांनी पाठिंबा दर्शविला. भाजप ओबीसी सेलचे विदर्भ प्रमुख प्रकाश बगमारे, माजी नगरसेवक प्रकाश भोयर यांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला. तसेच शरद वानखेडे, परमेश्वर राऊत, शकील पटेल, शंकर मौर्य, निखिल भुते, नाना झोडे, विनोद इंगोले, वृषभ राऊत, राहुल करांगडे, निलेश कोढे, दीपक कारेमोरे, रितेश कडव, श्रीकांत मसमारे, अनंत बारसागडे आदींचे सहकार्य लाभले.

# 9 तारखेला आशा व गटप्रवर्तक यांचा मुख्यमंत्री कार्यालयावर मोर्चा : कॉ. राजेंद्र साटे

**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयू) नागपूर जिल्हा तर्फे गुरुदेव सेवाश्रम येथे जिल्हास्तरीय आमसभा पार पडली. आम सभेत विचार मांडताना कॉ. राजेंद्र साठे यांनी सांगितले कि, इतर उत्सवासोबत गणपती उत्सव सुरू आहे. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांच्यावर ऑनलाईन कामाच्या सक्ती सोबतच इतर कामाचा बोजा दिवसेंदिवस वाढवण्यात येत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच इतरांना ऑगस्ट महिन्याचे मानधन महिना संपण्याच्या आधीच प्राप्त झालेले आहे. एकट्या नागपूर महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या शहरी आशा वर्कर यांचे मानधन करण्याकरता 276.48 लक्ष रुपयाची गरज असून संपूर्ण महाराष्ट्राच्या आकडा समोर आलेला नाही. परंतु आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना गेल्या दोन महिन्यापासून राज्याचे व जानेवारीपासून केंद्राचे मानधन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे त्यांचेवर उपासमारीची पाळी आलेली आहे. कामाच्या ऑनलाईन एन्ट्रीमुळे नागरिकांना सेवा देणारी आशा त्या प्रमाणात सेवा देऊ शकत नसल्यामुळे माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. त्यानंतर सुद्धा आशा वर्करला यामध्ये दोषी धरण्यात येत आहे. वारंवार ऑनलाइन काम करण्याकरता डाटा ऑपरेटरची नेमणूक शासनाने करावी. याकरता पत्र व्यवहार केला जात असून सुद्धा शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. अल्प मोबदल्यामध्ये काम करणारे आशा वर्कर यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा व किमान वेतन मिळावे, रिटायरमेंटनंतर 5 लाख रुपये ग्रॅज्युटी व 10 हजार रुपये पेन्शन मिळावे, चोरी क्षेत्रात काम करणाऱ्या आशा वर्कर करतात. गटप्रवर्तकांची नेमणूक करावी अशा विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रातील आशा वर्कर थकीत मतदानाच्या विषयावरून ग्रासल्या असून परत एकदा संप करावा असे बोलून दाखवत आहेत. वारंवार पत्र व्यवहार करून सुद्धा शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागपूर जिल्हा कमिटी तर्फे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये वरील मागण्याकरता पिटीशन दाखल करण्यात याव्या याकरिता सर्वांनी मान्यता दिली. वारंवार केंद्र व राज्य शासनाचे लक्ष वेधून सुद्धा शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे येत्या 9 सप्टेंबर रोजी खंडोबा देवस्थान, सुभाष रोड येथून मुख्यमंत्री कार्यालयावर विशाल मोर्चा करण्याच्या निर्णय घेण्यात आला. वरील मोर्चाला मोठे स्वरूप आणण्याकरता विदर्भ स्तरीय मोर्चा करण्याचा आम्ही प्रयत्न करू व संपूर्ण विदर्भातील आशा वर्कर व गटप्रवर्तक नागपूरला एकवटण्याचा आम्ही प्रयत्न करू असे कॉ. राजेंद्र साठे यांनी बोलून दाखवले. येत्या मंगळवारी नागपूर येथे महाराष्ट्र आशा गटप्रवर्तक फेडरेशन-सीटूचे विदर्भातील सर्व पदाधिकारी




यांची मीटिंग असून त्यामध्ये पुढील निर्णय घेण्यात येणार असे त्यांनी सांगितले. 9 सप्टेंबर किंवा त्यापुढे शासनाने लवकर थकीत मानधन न दिल्यास आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना बेमुदत संपावर गेल्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही असा निर्णय घेण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये वरील मागण्याकरता दाखल करण्यात येणाऱ्या याचिकेकरता ॲड. मयूख आवळे यांची एक मताने सर्व आशा वर्कर यांनी निवड केली असून, त्यांनी केस बद्दल गुरुदेव सभागृह येथे येऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने जिल्हा महासचिव प्रीती मिश्रा यांनी आशा वर्कर यांची व्यथा मांडली असून आभार प्रदर्शन माया कावळे यांनी करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे समापन झाले. कार्यक्रमाला प्रामुख्याने कॉ. राजेंद्र साठे, प्रीती मेश्राम, रंजना पौनीकर, माया कावडे, उज्वला कांबळे, सरिता ठवरे सहज इकडे आशा वर्कर व गटप्रवर्तक उपस्थित होते.



# ज्येष्ठ नागरिक डी.डी. गजभिये यांचा सत्कार

**वाडी :** दवलामेटी येथील रहिवासी ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्ते दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया नागपूर जिल्हा शाखेचे मीडिया समन्वयक डी.डी. गजभिये यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को.ऑप. बँकेच्या वतीने झालेल्या आमसभेत करुणा सांस्कृतिक भवन नागपूर येथे त्यांनी बँकेच्या विकासात विशेष सहयोग प्रदान केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. या सत्काराचे श्रेय त्यांनी संचालक मंडळ अध्यक्ष अनिल नगरारे व संचालक तथा दैनिक बहुजन सौरभचे सहायक संपादक नागेश बुरबुरे यांना देऊन त्यांचे आभार मानले. सत्कार प्रसंगी गवर्नमेंट पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन.एन. मिश्रा, सचिव के.बी. इंगळे, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा अध्यक्ष राजेश दहिवले, सचिव आकाश चौरे, तुळशीदास लिंगायत, अशोक सोनटक्के, रंजीत राऊत, जी.डी. गोंडाने, संजना गजभिये, गीता गजभिये, शीला रंगारी, किरण राऊत, यांनी शुभेच्छा व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले.

## निधन वार्ता

### रत्नदीप उर्फ बादल बाबुराव बागडे



**नागपूर :** कुंजीलाल पेठ, रामेश्वरी रोड, नागपूर येथील रहिवासी रत्नदीप उर्फ बादल बाबुराव बागडे यांचे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे 43 वय होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई व तीन बहिणी असा बराच मोठा परिवार आहे. ते वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते होते. सोमवार दि. 01 सप्टेंबर रोजी, सायंकाळी. 6 वाजता. मोक्षधाम घाटावर अंतिम संस्कार करण्यात येईल.

### तानाबाई गुलाबराव कुरैवार



**नागपूर :** दक्षिण नागपूर येथील सरस्वती नगर येथील रहिवासी तानाबाई गुलाबराव कुरैवार यांचे शनिवारी 30 ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे 88 वय होते. त्यांच्या पश्चात चार मुले व दोन मुली तसेच भरपूर मोठा आप्त परिवार आहे. अंतिम संस्कार (रविवारी) मानेवाडा घाटावर करण्यात आले.

### अमोल नगराळे



**नागपूर :** वसंतनगर, जुना बाभूळखेडा येथील रहिवासी अमोल विठ्ठलराव नगराळे यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. ते 46 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगी आहे. सोमवार, दि. 1 सप्टेंबर रोजी मानेवाडा घाट येथे अंतिम संस्कार पार पडले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648